## ‘बार्टी’च्या ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशीप मंजूर



**मुंबई** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) वतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती अंतर्गत ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १२) घेतला. बार्टी, सारथी, टीआरटीआय,महाज्योती या संस्थांच्या वतीने पीएचडीसाठी दिल्या जाणाऱ्या फेलोशीपकरीता एक सर्वंकष समान धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले. या मागणीसंदर्भात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. या वेळी सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे आणि शिष्टमंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते. ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याची मागणी मुख्यमंत्री शिंदे यांनी मान्य केली. त्याचे स्वागत करतानाच विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २६४
www.ramprahar.com

गुरुवार, १३ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


मुरूड सुपेगाव येथील ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश/२

कामोठ्यात पत्नीचा खून; आरोपी पती अटकेत/३

नितळस येथे गावदेवींच्या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे सामने/८


### अवकाळी पावसाने राज्यातील १४ जिल्ह्यांना फटका

# आठवडाभरात पंचनामे करून भरपाई -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने राज्यातील १४ जिल्ह्यातील हजारो एकरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. सर्वाधिक नुकसान नाशिक जिल्ह्यात झाले आहे. नाशिक जिल्ह्यात आठ हजार हेक्टर शेतीचे नुकसान झाले आहे. त्याखालोखाल अहमदनगर जिल्ह्यात सात हजार ३०५ हेक्टरवर नुकसान झाले. अवकाळी पावसाचा मोठा फटका राज्यातील शेती पिकांना बसला आहे. यामध्ये फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. द्राक्ष, आंबा, केळी संत्रा, काजू या बागांना पावसाचा मोठा फटका बसला आहे. या सर्व नुकसानीचे पंचनामे एका आठवड्यात करून शेतकऱ्यांना लवकर लवकर नुकसानभरपाई देण्यात येईल, असे अश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १२) भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे व विरोधी पक्षनेते अजित पवार यांना दिले आहे.

भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे व विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी बुधवारी राज्यात सुरू असलेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानभरपाईसंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सह्याद्री अतिथीगृहात भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आश्वासन दिले.

अवकाळी पावसाच्या पहिल्या टप्प्यात ४ ते ९ मार्चदरम्यान झालेल्या गारपीटीने १५ जिल्ह्यांमध्ये ३८ हजार ६०६ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. त्यानंतर १५ ते २१ मार्चदरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे ३० जिल्ह्यांमध्ये तब्बल एक लाख सात हजार हेक्टरी पिकांचे नुकसान झाले आहे, तर आता तिसऱ्या अवकाळी पावसामध्ये २८ हजार २८७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाल्याचा अंदाज कृषी विभागाला आहे.

तळ कोकणातही सलग दोन दिवस पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, काजू, कोकम, जांभूळ पिकांना फटका बसला आहे. जांभूळ गळून मातीमोल झाली आहेत, तर आंब्यातही पावसामुळे जंतू तयार होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे.

अवकाळी पावसामुळे शेतीचे जे नुकसान झाले आहे, त्याचे पंचनामे एका आठवड्यात करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याचा आमचा प्रयत्न आहे. नुकसानग्रस्त भागातील एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. पंचनामे करण्यासाठी वेळ पडल्यास इतर तालुक्यांतील अधिकाऱ्यांना बोलावून घ्यावे, असे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एका आठवड्यात त्यांच्या खात्यावर भरपाईची रक्कम जमा केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली, तर शेती नुकसानीचे प्राथमिक अंदाज आमच्याकडे आले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



> ‘नमो’ शेतकरी सन्मान योजनेत आता शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजारांची मदत देण्यात येत आहे, तसेच एका रुपयात पीकविमा काढण्यात येत आहे. नैसर्गिक आपत्तीत आतापर्यंत १० हजार कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. यापुढेही शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल.
>
> -एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

### ...आणि २४ तासांच्या आत त्यांना मिळाले घर

**अहमदनगर** : राज्यात सातत्याने होणाऱ्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यासह गारपीट झाल्याने अनेक घरांची पडझड झाली. अहमदनगरच्या पारनेर तालुक्यातील वनकुटे येथे वादळी पावसामुळे पडझड झालेल्या घरांची राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी केली होती. त्यावेळी उघड्यावर आलेले संसार पाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तातडीने प्रशासकीय अधिकाऱ्यांना निर्देश दिले आणि २४ तासांच्या आत हिरामण बर्डे आणि कचरू वाघ यांना घर मिळाले.

### कोकणात आंबा महोत्सव आयोजित करावा -ना. राणे

भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची सह्याद्री अतिथीगृहात भेट घेतली. अवकाळी पावसाने कोकणातील आंब्याच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. येणाऱ्या काळात आंबा महोत्सव मोठ्या प्रमाणात भरवला जावा, ज्यामुळे आंबा शेतकऱ्यांच्या नुकसानीची भरपाई होण्यास मदत होईल, अशी मागणी मंत्री राणे यांनी केली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली.





# सर्वांनी मिळून महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा यशस्वी करूया

- उद्योगमंत्री तथा पालकमंत्री उदय सामंत यांच्या सूचना
- खारघर येथे घेतला पूर्वतयारीचा आढावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२२च्या वितरण सोहळ्याची जोरात तयारी सुरू असून सर्व शासकीय यंत्रणांनी उत्तम समन्वयाने काम करावे, सर्वांनी मिळून हा सोहळा यशस्वी करूया, असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी (दि. १३) खारघर येथे दिल्या.

२०२२ या वर्षासाठीच्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांना रविवारी (दि. १६) देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसंदर्भात रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय मुखर्जी, सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, रायगड जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त तिरुपती काकडे, वास्तुविशारद योगेश वाजेकर, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, ॲड. नरेश ठाकूर, प्रवीण पाटील, वासुदेव पाटील, कीर्ती नवघरे, हॅप्पी सिंग, खारघर मंडल अध्यक्ष बिजेश पटेल आदींसह श्री सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्र्यांनी महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी शुक्रवारपासून उपस्थित राहणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, शौचालय, सुरक्षाव्यवस्था, वाहनांसाठी पार्किंग, विविध ठिकाणांहून नवी मुंबईला जोडणारे रस्ते यासाठी आवश्यक साधन सामग्रीबाबत आढावा घेतला. यासाठी श्री सदस्य हे शासन आणि प्रशासनाला सहकार्य करतील, अशा सूचना दिल्या.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी ३०६ एकर क्षेत्रात तयारी सुरू आहे. या कार्यक्रमासाठी १८ लाख ३६ हजार लोकांसाठी आसन क्षमता आहे. सार्वजनिक वाहतुकीकरिता (बस, रेल्वे, कॅब) आठ लाख ४३ हजार २४०, खासगी बस नऊ लाख १५ हजार ७६०, खासगी कार ७७ हजार एवढे लोक येतील. याकरिता पार्किंगची आवश्यकता १६ हजार ६५० तर कार ११ हजार एवढी आहे. सभामंडपात वैद्यकीय केंद्र, पाणीटँकर, रुग्णवाहिका, कार्डियाक रुग्णवाहिका, मोबाईल टॉयलेट या सर्व व्यवस्था असणार आहेत. (पान २ वर..)

## निवडक

### पुढील आणखी काही दिवसही ‘अवकाळी’चा इशारा

**मुंबई** : पुढील पाच दिवसांत कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. गुरुवारी (दि. १३) कोकणात विजांच्या कडकडाटासह तर शुक्रवारी (दि. १४) मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात गारपीट होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

### नागपूर-मुंबईदरम्यान १० समर स्पेशल रेल्वेगाड्या

**नागपूर** : नागपूर ते मुंबईदरम्यान १० समर स्पेशल गाड्या सोडण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला आहे. नागपूर- मुंबई दरम्यान साप्ताहिक सुपरफास्ट ६ मे ते ३ जूनपर्यंत दर शनिवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून रात्री १२.२० वा. सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी ३:३० वा. नागपूरला पोहचेल. ३० एप्रिल ते २८ मे दरम्यान दर रविवारी नागपूरहून दुपारी दीड वाजता मुंबईसाठी गाडी रवाना होईल.

## बोरघाटात तेलाचा टँकर उलटला; वाहतूक खोळंबली



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील बोरघाटातील किमी ३९ जवळ पुणे येथून मुंबईला खाद्यतेलाची वाहतूक करणारा टँकर बुधवारी (दि. १२) सायंकाळी ५.१५ वा. उलटला. या टँकरमधील खाद्यतेल महामार्गावर पसरले. यामुळे पुण्याहून मुंबई जाणारी वाहतूक एक तास खोळंबली होती. वाहतूक सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले व त्यांच्या पथकाने अपघाताची माहिती मिळताच, तेलावर माती टाकून वाहतूक पूर्ववत केली.

टँकर (नं. एमएच ०४ एचवाय ०५१९)वरील चालक सुभाष यादव हा पुणे ते मुंबई असा घेऊन जात असताना, गिअर बॉक्स तुटून पडल्याने चालकाचे टँकरवरील नियंत्रण सुटून टँकर रोडच्या बाजूला डोंगर भागाला धडकून उलटला. सुदैवाने टँकरवरील चालक सुरक्षित आहे.

या ठिकाणी तातडीने अफकॉन्स कंपनीच्या सहाय्याने माती टाकण्याचे काम करण्यात आले. मुंबई लेनवरील वाहतूक खोपोली एक्झिट मार्गाने वळवण्यात आली असून दोन लेनने वाहतूक सुरू करण्यात आली.

घटनास्थळी बोरघाट पोलीस, मृत्यूंजय टीम, देवदूत टीम, अफकॉन्स कंपनीची मशनरी यंत्रणा, सेफ्टी इंजिनिअर व कामगारांनी मदत करून रस्त्यावर माती टाकून दक्षता घेतली.

# पनवेल महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकांना मालमत्ता करामध्ये दिलासा देण्यासाठी कायद्यात काही बदल करावा लागला तरी तो करून पनवेलकरांना मदत करावी, अशी मागणी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य सरकारकडे केली आहे. दुसरीकडे मात्र माजी नगरसेविका लीना गरड आणि खारघर फेडरेशनचे सेक्रेटरी एस. एच. कलावत यांनी नागरिकांची दिशाभूल केली. त्यांच्यामुळे पालिकेबरोबरच मालमत्ताधारकांचे आर्थिक नुकसान झाल्याने या दोघांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही पनवेल महापालिकेकडे करणार असल्याचे त्यांनी सांगितले.





आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिका क्षेत्रातील विशेषतः सिडको वसाहतीमधील मालमत्ता कराच्या तिढ्याबाबत विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याआधी लक्ष वेधले होते. एकूण मालमत्ता करामध्ये नागरिकांना दिलासा देण्याची आग्रही मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी केली आहे.

याबाबत सरकार नक्कीच सकारात्मक भूमिका घेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, पनवेल महापालिकेची स्थापना झाल्यानंतर महापालिकेच्या हद्दीमध्ये विकासकामांना सुरुवात झाली आहे. पाणीपुरवठा वगळता सर्व सेवांचे हस्तांतरण झाल्यानंतर सर्व सेवांचा दर्जा सुधारल्याचे आढळून येईल. पनवेल महापालिका झाल्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, वडाळे तलाव व अन्य अनेक महत्त्वांच्या ठिकाणांचा कायापालट झाला आहे. महापालिका हद्दीतील समाविष्ट सर्व गावांमध्ये पायाभूत सुविधांच्या कामांना प्रारंभ झाला आहे.

प्रशासनाने पालिका क्षेत्राचे स्मार्ट सिटीत रूपांतर व्हावे याकरीता पाऊले उचलली आहेत. रस्ते, ड्रेनेच वॉटरची व्यवस्था, इमारतींचे योग्य नियोजन, खेळाची मैदाने, नागरिकांची पाण्याची गरज ओळखून नव्याने पाईपलाईन टाकणे, नवीन जलकुंभाची जागा निश्चित करणे, आवश्यक त्या ठिकाणी वॉटर पंपाची जागा सूचवणे, (पान २ वर..)

# पनवेल महापालिका क्षेत्रात पाण्यासाठी उपाययोजना

- पाईपलाईन कामाचे भाजप नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या माध्यमातून एमजेपीकडून नवीन पाण्याचे कनेक्शन घेण्यात आले आहे. त्या अंतर्गत नवीन १४ इंचाची पाईपलाईन मार्केट यार्ड येथे असलेल्या पाण्याच्या टाकीला जोडण्यात येणार आहे. या पाईपलाईन टाकण्याच्या कामाचे भूमिपूजन बुधवारी (दि. १३) माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

पनवेल महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण वाढत आहे. येथील नागरिकांना पाण्याचा तुटवडा भासू नये, याकारीता भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अमादार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली उपाययोजना सुरू आहेत. त्या अंतर्गत मार्केट यार्ड येथे अमृत योजनेंतर्गत पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे. या टाकीसाठी एमजेपीकडून नवीन कनेक्शन घेण्यात आले आहे. त्यानुसार महापालिकेच्या वतीने नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू झाले असून त्याचे भूमिपूजन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या पाईपलाईनमुळे कल्पतरू परिसरातील सोसायट्यांना फायदा होणार आहे. या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, पनवेल किसान मोर्चाचे अध्यक्ष रुपेश परदेशी, प्रभाग क्र.१९चे अध्यक्ष पवन सोनी, तुषार कापरे, ठेकेदार मनोज खांदेशे, अतुल पाटील आदी उपस्थित होते.

## नवी मुंबईतून हापूस आंबा पोहचला अमेरिका व जपानला

**नवी मुंबई : बातमीदार**

या वर्षी राज्यात उत्पादित होणाऱ्या आंब्याला विकसित देशांची बाजारपेठ उपलब्ध होण्याकरिता निर्यातीसाठी आवश्यक असलेल्या सर्व सोयीसुविधा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाने उपलब्ध करून दिल्या आहेत. त्या अंतर्गत ८ एप्रिल रोजी जपानला आणि ११ एप्रिल रोजी अमेरिकेला पहिला आंबा माल पाठविण्यात आला, अशी माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधेवरून ८ एप्रिल रोजी केशर व बैगनपल्ली असा एकूण १.१ मे. टन आंबा जपानला रवाना करण्यात आला. अशाचप्रकारे ११ एप्रिल रोजी मंडळाच्या वाशी येथील विकीरण सुविधा केंद्रावरून ६.५ मे. टन हापूस, केशर व बैगनपल्ली या आंब्याची पहिली कन्साईनमेंट अमेरिका येथे निर्यात करण्यात आली.

# संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याची घोषणा

### ११ जूनला होणार प्रस्थान; वारकऱ्यांमध्ये आनंद

**पुणे : प्रतिनिधी**

देहू देवस्थाननंतर आता आळंदी देवस्थाननेही आषाढी पालखी सोहळ्याची घोषणा केली आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी ११ जूनला आळंदीमधून प्रस्थान करेल, तर २८ जूनला पंढरपूरमध्ये पोहचेल. २९ जूनला संत ज्ञानेश्वर माऊलींची विठुरायांशी भेट घडेल. देवस्थानने या पायी वारीची घोषणा केल्याने वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पहायला मिळत आहे.

सोहळ्यात श्रींचा पालखी सोहळा पुण्यनगरीत दोन दिवस पाहुणचार घेत १४ जूनला सासवड मुक्कामास दिवे घाटातून हरिनाम गजरात मार्गस्थ होईल. १४ आणि १५ जूनला सासवड मुक्काम, १६ जूनला जेजुरीकडे प्रस्थान, १७ जूनला जेजुरीला मुक्काम, १८ जूनला लोणंद येथे सोहळा विसावेल. १९ जूनला अधिक एक दिवसाचा मुक्काम आणि २० जूनला तरडगाव, २१ जूनला फलटणकडे प्रस्थान आणि २२ जूनला फलटणमध्ये मुक्काम, २३ जूनला नातेपुते, २४ जूनला माळशिरस मुक्काम, २५ जूनला वेळापूर, २६ जूनला भंडी शेगाव, २७ जूनला वाखरी, २८ जूनला पंढरपूर, २९ जूनला आषाढी एकादशी सोहळा साजरा होईल. पालखी सोहळ्यात फलटण येथे २१ जून, बरड येथे २२ जूनला एक दिवसांच्या मुक्कामासाठी सोहळा विसावणार आहे.



२१ जूनला फलटणकडे प्रस्थान आणि मुक्काम होईल. २२ जूनला बरड मुक्काम असेल. ३ जुलै पौर्णिमेपर्यंत सोहळा पांढरी नगरीत विसावेल. ३ जुलैला गोपालकाला होऊन सोहळा परतीच्या प्रवासासाठी अलंकापुरीकडे निघणार आहे. आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगेश देसाई आणि विश्वस्त मंडळ यांचे मार्गदर्शनात सोहळ्याची तयारी सुरू करण्यात आली आहे.

**संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे १० जूनला प्रस्थान**

यंदा जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी देहूतून १० जूनला पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. २८ जून रोजी संत तुकारामांची पालखी पंढरीत दाखल होणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख भानुदास महाराज मोरे, देहू देवस्थानाचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी बुधवारी सांगितले.

# सावरकरांचे भगूर येथील स्मारक स्फूर्तीस्थळ व्हावे

**सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे निर्देश**

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे भगूर येथील स्मारक अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नव्या पिढीसाठी स्फूर्तीस्थळ व्हावे, यासाठी तत्काळ कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित आढावा बैठकीत मंत्री श्री. मुनगंटीवार बोलत होते. बैठकीला सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे, सावरकर स्मारक समितीचे अध्यक्ष रणजित सावरकर, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर, निवेदक मंजिरी मराठे आदी उपस्थित होते.



मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी संस्कारित स्वातंत्र्याचा विचार मांडला. २१ व्या शतकात तज्ज्ञ आणि तंत्रज्ञानाचा संपूर्ण उपयोग करुन स्वातंत्र्यवीर सावरकरांचा इतिहास नव्या पिढीला दाखवा. भगूर या गावात प्रवेश करताच विनायक दामोदर सावरकर यांचा जीवनपट समोर यावा अशा पद्धतीने काम व्हावे, अशा सूचनाही या बैठकीत दिल्या.

**बोलक्या भिंती व्हाव्यात**

**सावरकर वाडा या घरात त्यांचे बालपण गेले. वाड्याला राज्य शासनाच्या पुरातत्व विभागाने स्मारकाचा दर्जा दिला. स्मारक आणि वाड्याच्या भिंती केवळ माती विटांच्या भिंती न राहता त्या सावरकर यांचा राष्ट्रभक्तीचा संदेश देणाऱ्या बोलक्या भिंती व्हाव्यात.**



**रोहा तालुक्यातील वाशी येथील भाजपा बुथ अध्यक्ष विकास बामणे त्याची बहीण दर्शना हिच्या विवाहप्रसंगी आशीर्वाद देण्यासाठी बुधवारी भाजपा नेते आमदार धैर्यशील दादा पाटील यांची उपस्थिती लाभली. त्याच्या समवेत दक्षिण रायगड युवा मोर्चा अध्यक्ष अमित दादा घाग, युवा मोर्चा चिटणीस नरेश कोकरे, धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, रोहा शहराध्यक्ष निलेश धुमाळ, शिंदे गट शिवसेना धाटाव विभागीय नेते राजेश भगत, सचिन मोरे, निलेश जंगम, महेश बामणे यासह भाजपा पदाधिकारी व मित्रपरिवार, ग्रामस्थ उपस्थितत होते.**

# सुपेगाव येथील ग्रामस्थांचा भाजपमध्ये प्रवेश

**मुरुड : प्रतिनिधी**

भाजपच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून फणसाड अभयारण्य शेजारी असणारे सुपेगाव येथील ग्रामस्थांनी शेकडोच्या संख्येने भाजपमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्य प्रणालीवर विश्वास ठेवत या सर्व ग्रामस्थांनी भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेश कार्यक्रमाच्यावेळी माजी जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते, भाजपचे मुरुड तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, तालुका उपाध्यक्ष स्वप्नील चव्हाण, भटक्या विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष शैलेश काते, युवा मोर्चा अध्यक्ष समीर शिंदे, जेष्ठ नेते जयवंत अंबाजी, तालुका उपाध्यक्ष महेश मानकर, सुदाम वाघिलकर आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. महेश मोहिते यांनी सांगितले कि, ज्या विश्वासाने ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. तो विश्वास अबाधित ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. सुपेगाव गावातील निर्धारित सर्व कामे पूर्ण करून देण्यासाठी भाजप कटिबद्ध असून विकास काय असतो हे आम्ही दाखवून देणार आहोत. भाजपने ग्रामीण भागातील गरजा ओळखल्या असून त्या झटपट पूर्ण करण्याचा आमचा मानस असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.लवकरच विविध खात्यामधील मंत्र्यांकडून निधी वितरित होत असताना सुपेगाव या गावाला प्रथम प्राधान्य देणार असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमासाठी असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्जत येथील रक्तदान शिबिराला प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून भीमगर्जना मित्र मंडळ बौद्ध नगर कर्जतच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजभाऊ कोठारी यांनी आयोजित केले कर्जत, खालापूर तालुक्यातील हे ४७५ वे रक्तदान शिबिर ठरले.

या रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन राजाभाऊ कोठारी व लक्ष्मण नाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी भीम गर्जना मित्र मंडळाचे अध्यक्ष तुषार बेटकर, उपाध्यक्ष प्रणेश यादव, माजी अध्यक्ष सचिन भालेराव, योगेश गायकवाड, राहुल धनवटे, संतोष अडसूळे, प्रदीप हिरे आदी उपस्थित होते.



# अर्थसहाय्य मिळविण्याबाबत सहकार्य करण्याच्या महापालिकेडून बँकांना सूचना

प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधी योजना

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिकेच्यावतीने प्रधानमंत्री आत्मनिर्भर निधी योजने अंतर्गत पथविक्रेत्यांना दहा हजाराचे भांडवल सहाय्य कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहे. बँकांमध्ये अर्ज केलेल्या पथविक्रेत्यांना सहकार्य करून लवकरात लवकर त्यांचे कर्ज मंजूर करून वितरण करावे अशा सूचना उपायुक्त कैलास गावडे यांनी बँक प्रतिनिधींना दिल्या.

महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान विभागाच्यावतीने बुधवारी चारही प्रभागातील सर्व बँक प्रतिनिधींची मुख्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी डेएनयुलएम विभागाच्या व्यवस्थापिका विनया म्हात्रे उपस्थित होत्या. पनवेल महानगरपालिकेकडून पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी अंतर्गत महापालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांना कर्ज मिळविण्याकरीता अर्ज भरण्यात आले आहेत. बँकानी प्रलंबित असणारे कर्ज प्रस्ताव तात्काळ मंजूर करून कर्ज वितरीत करण्याबाबत यावेळी उपायुक्तांनी सूचित केले.महानगरपालिका क्षेत्रातील सर्व फेरीवाल्यांना व्यवसाय करण्याची संधी मिळण्याकरीता बँकानी सहकार्य करण्याबाबत त्यांनी बँकाना सूचित केले.



नगरपथविक्रेते अनौपचारिक नागरी अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्वाचा घटक आहे. नगरवासीयांच्या आर्थिक कुवतीप्रमाणे स्वस्त दरात वस्तु व सेवांची उपलब्धता सुनिश्चित करण्यात ते महत्वपूर्ण भूमिका बजावतात. कोविड- १९च्या टाळेबंदीमध्ये पथविक्रेत्यांच्या उपजिविकेवर विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे पथविक्रेत्यांच्या व्यवसायास खेळत्या भांडवलांचा पतपुरवठा तातडीने करण्याच्या उद्देशाने केंद्र शासन पुरस्कृत पंतप्रधान स्वनिधी पथविक्रेत्यांसाठी विशेष सुक्ष्म पतपुरवठा सुविधा योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजने अंतर्गत पनवेल महानगरपालिकेच्यावतीने महापालिका क्षेत्रातील पथविक्रेत्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य केले जात आहे.

**पथविक्रेत्यांना आवाहन**

*पथविक्रेत्यांनी कर्ज मंजूरीसाठी बँकेमध्ये जाताना आधार कार्ड व पॅन कार्ड घेऊन जाण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. तसेच बँकेमध्ये आलेल्या पथविक्रेत्यांना तात्काळ त्यांचे अर्ज स्वीकारून कर्ज वितरीत करण्याच्या सूचना उपायुक्तांनी बँक प्रतिनिधींना दिल्या आहेत.*

पान १ वरून

## सर्वांनी मिळून महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा यशस्वी करू

तर सभागृहाच्या पश्चिमेला वाय-१ ते वाय-१३ स्टेज (प्रतिबंधित क्षेत्र) असेल, तर ब्लॉक २,३,४,५,६,७ असे असणार आहेत. ब्लॉक चारमध्ये आरक्षित व्यवस्था असेल.

मुख्य कार्यक्रमाच्या ठिकाणी येण्याकरिता टाटा मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल, गुरुद्वारा, गोल्फचे मैदान, उत्स्व चौक, खारघर स्टेशन, मुंब्रा-पनवेल महामार्ग, सायन-पनवेल हायवे या मार्गाने व्यवस्था करण्यात आली आहे. पार्किंग व्यवस्था-२ ऑरेंज झोन-कोकण, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, सोलापूर, बीड, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, कर्नाटक, आंध्रप्रदेश, केरळ या ठिकाणांहून वाहने येतील. कोपरा (३३० बस/कार), मुरबीने मैदान (५८० बस/कार ), एक्सस्टोर-१५ ग्राऊंड (४०० बस/कार), सेक्टर-१६, (७७० बस/ कार), जामशेद ठाकरे एडक्लिफ स्कूल ग्राऊड (४० बस/कार ), केएलआयइएस कलंबोली (४९० बस/ कार), रोडपाली क्रीडा मैदान (१५१० बस/ कार), खांदेश्वर रेल्वे स्टेशन मैदान-१ व मैदान-२ अनुक्रमे ७०० ते ५६०, रोडपाली सेक्टर-२०अंतर्गत रस्ते -३४० ते २००, कामोठे अंतर्गत रस्ते-४०० ते २०० असे एकूण पार्किंग-२ ऑरेंज झोनमध्ये ७,२५० बस तर ४०४० कारची पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. पार्किंग-१मध्ये २,२८५ बस तर १,९३४ कारची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी गुजरात, उत्तर प्रदेश, जव्हार, वाडा, पालघर, डहाणू, भिवंडी, आदी ठिकाणांहून वाहने येतील. पार्किंग-१मध्ये भारती विद्यापीठ ग्राऊंड उत्स्व चौक, सेक्टर-५,६,७ उत्सव चौक सेट्रल सेक्टर-१९, २० सीबीडी स्टेशन पार्किंग सीबीडी सेक्टर-११ अंतर्गत रस्ते आदी ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

पार्किंग व्यवस्था-३ ब्ल्यू झोन- नाशिक, धुळे, जळगांव, नंदूरबार, जालना, संभाजीनगर, बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर, मध्यप्रदेश आदी ठिकाणांहून ७,२५० बस तर ३,४११ कारकरिता पेटगांव, खडकी ग्राऊंड, तळोजा, इनामपुरा ग्राउंड-१, २, ओवे कॅम्प ग्राऊंड, अमनदूत स्टेशन रोड, वास्तूविहार रोड, तळोजा जेल रोड आदी ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

या वेळी महापालिका, पोलीस यंत्रणा, सिडको यासर्व यंत्रणांकडून पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, आवश्यक वस्तूंची आकडेवारी मागविण्यात आली होती. सुमारे २० लाख नागरिक या सोहळ्यासाठी उपस्थित राहतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, इतक्या प्रचंड जनसमुदायाची गैरसोय होऊ नये, याबाबत सर्व यंत्रणांना काटेकोरपणे काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाढत्या कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेऊन येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला मास्क लावणे अनिवार्य करण्यात आले आहे. आरोग्याच्या दृष्टीने डॉक्टर, रुग्णावाहिका, आवश्यक औषधांचा पुरवठा तैनात ठेवण्यात येणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन दलाकडून फायर ऑडिट करुन घेण्यात येत आहे, तसेच श्री सदस्यांना आपातकालीन परिस्थितीत आग विझवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

## पनवेल महापालिकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करा

वाढत्या लोकसंख्येचा विचार करता पुढील ५० वर्षांचे नियोजन करून नवीन धरणासाठी जागा सूचवणे, कचरा वर्गीकरण करण्याबाबत नवीन उपाययोजना, नवीन शौचालयाच्या जागा निश्चित, पालिका क्षेत्रात शोभेच्या बेटांची जागा त्याचप्रमाणे शहरातील विकासाविषयी आराखडा बनवणे यासाठी महापालिकेच्या माध्यमातून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे गावठाणाबरोबरच संपूर्ण पालिका क्षेत्राचा आता खऱ्या अर्थाने विकास होणार आहे, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला आहे.

**खारघर फेडरेशनची याचिका मुंबई न्यायालयाने फेटाळली**

*मुंबई उच्च न्यायालयात मालमत्ता कराविषयी याचिकेवर दोन्ही बाजूंनी वाद-प्रतिवाद करण्यात आला होता. महापालिकेच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. आशितोष कुंभकोणी यांनी बाजू मांडली होती, तसेच ॲड. केदार दिघे यांनी या याचिकेमध्ये पालिकेच्या बाजूने विधीज्ञ म्हणून काम पाहिले होते. या याचिकेवर न्यायमूर्ती यांनी ही याचिका विचारात घेता येणार नाही, तसेच ही याचिका कायद्यात किंवा तथ्यावर टिकू शकत नसल्याने याचिका फेटाळण्यात येत असल्याचा निकाल तीन दिवसांपूर्वी दिला आहे.*

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयात क्लबफुट क्लिनिकचे उद्‌घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल उपजिल्हा रूग्णालय क्युअर इंडिया ट्रस्ट आणि रोटरी क्लब पनवेल सिंफनी यांच्या संयुक्त संयोजनाने मंगळवारी (दि. ११) क्लबफुट क्लिनीक (ओपीडी) चे उद्‌घाटन पनवेल मनपाच्या एम.ओ.एच डॉ. आनंद गोसावी, मेडिकल सुपरीटेंडेंट (एस. डी. एच पनवेल) डॉ. मधुकर पांचाळ, बालकल्याण समिती रायगड सदस्या तथा रोटरी क्लब पनवेल सिंफनी सदस्य ॲड. शुभांगी झेमसे यांच्या हस्ते करण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालय ऑरथोपेडिक (ओ. पी.डी.) येथे आठवडयांच्या दर मंगळवारी सकाळी ९ ते ०५ या वेळात क्लबफुट उपचार संपूर्ण ट्रिटमेंट सर्वांसाठी फिमध्ये मिळणार आहे. ही उपचार पध्दत म्हणजे जन्मताच बाळाचे पाय वाकडे असणाऱ्या बाळांसाठी आहे. बाळाचे पाय सरळ होईपर्यंत करावी लागते. नॅशनल रूरल हेल्थ मशिन, बजाज फिनसर्व, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम हे क्लबफुट उपचार पध्दतीचे मिडिया पार्टनर आहेत. क्लबफुट महाराष्ट्राचे क्युअर इंडियाचे स्टेट प्रोग्मम मॅनेजर सचिन पाळे यांनी क्लबफुटची सविस्तर माहिती दिली.

डॉ. सागर खडसे, डॉ. संतोष वर्मा, डॉ. रवींद्र रोकडे, डॉ. शिल्पा वैशंपायन, ॲड. धनश्री भगत, ज्योती गुरव, स्वाती शिंदे, टिपणिस मॅडम असिस्टंट मेट्रन व हॉस्पिटलचा इतर स्टाफ कार्यक्रमास उपस्थित होते. पुनम ब्रास्को जिल्हा प्रोग्राम कोऑर्डीनेटर यांनी सर्वांचे आभार मानले.

# स्वातंत्र्यवीर गौरव दिनाचे स्वागत

**मुंबई : प्रतिनिधी**

सावरकर यांचा जन्मदिन स्वातंत्र्यवीर गौरव दिन म्हणून साजरा करण्याची घोषणा मुख्यमंत्री शिंदे यांनी केली. त्याचे स्वागत सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष रणजित सावरकर यांनी केले आहे. त्याचबरोबर त्यांनी सांगितले की, सावरकरांचे केवळ पुतळे उभारून चालणार नाही, तर त्यांचे विचार सर्वांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे.

सावरकर यांच्यावर केलेल्या विविध टीकांचा, वक्तव्यांचा भाग पाहता सावरकरांचा असा गौरव होणे यथोचितच आहे, तसे व्हायला हवेच होते. पदव्युत्तर अभ्यासक्रमात पूर्वी सावरकरांचे साहित्य अभ्यासासाठी होते, मात्र आज ते नाही. त्यामुळे सावरकरांचे विचार लोकांपर्यंत पोहचण्यासाठी, लोकांना त्याबद्दल अधिक कळावे म्हणून त्यांचे साहित्य अभ्यासक्रमात आणले पाहिजे, अशी मागणी रणजित सावरकर यांनी यानिमित्ताने व्यक्त केली.

# दिव्यांग आणि पालात राहणाऱ्यांसाठी स्वतंत्र घरकुल योजना तयार करावी

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामीण भागात दिव्यांग आणि पालात राहणाऱ्या नागरिकांसाठी स्वतंत्र घरकुल योजना तयार करावी. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या धर्तीवर भूमिहीन शेतमजुरांसाठी योजना तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे आमदार बच्चू कडू यांच्या मतदारसंघातील विविध विषयांसंदर्भात आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.


करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित

**द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी**

नोंदणी क्रमांक : एफ-१४०४० (रायगड) दि.२७-०१-२०२०

ता. उरण, जि. रायगड

**जाहीर नोटीस**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, मौजे करंजा, ता. उरण, जि. रायगड या गावात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सोय नव्हती म्हणू न रयत शिक्षण संस्थेने द्रोणागिरी प्रायमरी स्कुल इंग्रजी माध्यम व द्रोणागिरी हायस्कुल इंग्रजी माध्यम करंजा, या नावाने शाळा सुरु केली आणि महाराष्ट्र शासनाकडे शाळा मान्यतेचा प्रस्ताव सादर करुन सन १९८४ मध्ये इ. १ ली चा वर्गसुरु केला शासन निर्णयाचे सहपत्र क्र. व्ही. एल.एस.१०८७ - सी आर - ३३७०. दि. २१ सप्टेंबर १९८७ त्याचप्रमाणे सन १९८८ पासून इ. ५ वी चा वर्ग, सन १९८९ पासून इ. ६ वी चा वर्ग व सन १९९० पासून इ. ७ वी चा वर्ग सुरु केला. शासन निर्णयाचे सहपत्र क्र. प्रा/प्राशि / जा. तु. / पोआर / ९१ दि. १७/१२/१९९१ आणि सन १९९१ पासून इ. ८ वी चा वर्ग, सन १९९२ पासून इ. ९वी चा वर्ग व सन १९९३ पासून इ.१० वी चा वर्ग सूरु केला. शासन निर्णयाचे सहपत्र क्र.राजिप-शिक्षण-वाशी-६-९३/५२३५ दि. २९/१०/१९९३ या आदेशाने शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळाली.

संस्थेच्या द्रोणागिरी हायस्कुल इंग्रजी माध्यम मौजे करंजा या शाळेसाठी वापरण्यात येणारी इमारत,जमिन मिळकत, सर्व भौतिक सुविधा या करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी करंजा या शिक्षण संस्थेच्या मालकीच्या आहेत. विद्यालयाची इमारत, जमीन, फर्निचर हे करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी याच शिक्षण संस्थेच्या मालकीचे आहेत. तसेच शाळा व्यवस्थापनकामी येणारा सर्व खर्च करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी याच शिक्षण संस्थेच्या माध्यमातून केला जातो.

या कारणामुळे तांत्रिक दृष्टया शाळेचे व्यवस्थापन करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी करंजा शिक्षण संस्थेचे असावे यासाठी या शाळेचे हस्तांतरण करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी करंजा शिक्षण संस्थेकडे करण्याचा दोन्ही संस्थेमध्ये करार दि. १७/०१/२०२२ रोजी करण्यात आला. या करारानुसार रयत शिक्षण संस्था सातारा या संस्थेच्या नावे द्रोणागिरी हायस्कुल इंग्रजी माध्यम मौजे करंजा या विद्यालयासाठी देण्यात आलेली परवानगी करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी करंजा, ता. उरण, जि. रायगड या संस्थेच्या नावे बदल करुन देण्यासाठीचा प्रस्ताव मा. शिक्षण उपसंचालक साो, मुंबई यांचेकडे दाखल करत आहे. तरी याबाबत कोणाची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत मा. उपसंचालकसाो, मुंबई यांचे कडे लेखी तक्रार दाखल कराव्यात. विहित मुदतीनंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत. म्हणुन ही नोटीस दिली आहे.

**दि. ०५/०४/२०२३**

**सही/-** अध्यक्ष

**सही/-** सचिव

करंजा मच्छिमार सोसायटी प्रणित द्रोणागिरी एज्युकेशन सोसायटी

करंजा, ता. उरण, जि. रायगड

# पनवेल परिसरात गर्दुल्ले, भिकारी वाढले

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात गर्दुल्ल्यांसह भिकाऱ्यांचा वावर वाढत असल्याचे दिसून येत आहे. पनवेल रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपूल, दुर्गामाता मंदिर, साईबाबा मंदिर, कळंबोली सर्कल व दर्गा परिसरात गर्दुल्ल्यांसह भिकाऱ्यांचा वास्तव्यास वाढत आहे. मुख्यतः ते गर्दुल्ले परप्रांतीय असल्याने वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



पनवेल परिसरातील पनवेल रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपूल, दुर्गामाता मंदिर, साईबाबा मंदिर, कळंबोली सर्कल व दर्गा परिसरात गर्दुल्ल्यांसह भिकाऱ्यांचा वास्तव्यास वाढत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ही समस्या गंभीर झाली आहे. यामध्ये कडेवर मूल घेऊन सर्वत्र फिरणाऱ्या महिला जास्त दिसून आल्या. पनवेल रेल्वे स्थानक व बस स्थानक परिसरात हे भिकारी प्रवाशांचे कपडे पकडणे, हात पकडणे, पाया पडणे असे प्रकार करतात आणि पैसे देण्यास भाग पाडतात. स्थानकात तिकीट घराजवळही असाच प्रकार सुरू असतो. तर संध्याकाळी कार्यालयातून घरी जाणाऱ्या प्रवाशांचा स्थानकाबाहेरील बसस्थानक व रिक्षाथांब्यापर्यंत पिच्छा पुरवला जातो.

याचप्रमाणे शहरातील इतर परिसरात दिवसभर भीक मागायची, जे मिळेल ते अन्न खायचे आणि रात्री डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलाखाली आसरा घ्यायचा तर अनेकांनी पनवेल रेल्वेस्थानकाहून तक्का भागात जाणाऱ्या रस्त्यावरील उघड्या प्लॉट व फुटपाथवरच बेकायदेशीर झोपड्या उभारल्या आहेत. येथे रात्री सर्व एकत्र येऊन सर्व विधी उघड्यावर करण्याचा किळसवाणा प्रकार करतात. तसेच रात्री स्त्री-पुरुष दोघेही नशेत भांडणे करताना दिसून येतात. तर लहान बालके उघड्यावरच फिरत असतात.

### अटकाव करण्याची मागणी

***बहुसंख्य लोक परप्रांतीय असल्याने वाढत्या कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रुग्णांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने भिकारी-गर्दुल्ले यांचा लवकरात लवकर अटकाव करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.***

त्याचप्रमाणे या परिसरातून जाणाऱ्या प्रवाश्यांना लुटण्याचा प्रकारसुद्धा समोर आले आहेत.

या रस्त्यावरून येणाऱ्या प्रवाश्यांना एकटे बघून त्यांना धमकावून त्यांच्याकडून पैसे व अन्य मौल्यवान वस्तू हिसकावून घेतात. त्यामुळे त्या भागातून ये-जा करणाऱ्या स्थानिक रहिवाश्यांमध्ये भीतीयुक्त वातावरण आहे. तसेच डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलावरील दुभाजकावरसुद्धा हे भिकारी-गर्दुल्ले झोपत असल्याने अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

# वाजेच्या सरपंचपदी भाजपच्या मथुरा पाटील यांची बिनविरोध निवड





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाजे ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडणूक बुधवारी (दि. १२) झाली. या निवडणूकीत भारतीय जनता पक्षाच्या मथुरा मदन पाटील या बिनविरोध विजयी झाल्या आहेत. त्यानिमित्त भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी मथुरा पाटील यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

वाजे ग्रामपंचायतीच्या सरपंच अंजनी भालेकर यांनी राजीनाम्या दिल्याने सरपंच पदाची जागा रीक्त झाली होती. यासाठी बुधवारी निवडणूक झाली. यामध्ये भाजपच्या मथुरा पाटील बिनविरोध विजयी झाल्या. त्याबद्दल त्यांचे अनेक मान्यवरांनी अभिनदंन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, उपसरपंच गणेश पाटील, भाजप पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, शिवकरच्या माजी सरपंच मिनाक्षी ढवळे, ग्रामपंचायत सदस्य रेवन आत्माराम पाटील, अंजनी भालेकर, पदू नामदेव वाघ, भारती भालेकर, कमला कातकरी, काली शाम कातकरी, राजेश महादू भोईर, राघो बारकू पाटील, रूपेश भोईर, मदन पाटील, माजी उपसरपंच राजेंद्र भालेकर, शाम भालेकर, सुनील पाटील, भगवान बुवा पाटील, यशवंत बुवा पाटील, सीताराम बुवा जळे, विष्णू बुवा पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



**पनवेल : तालुक्यातील न्हावेखाडी येथील म्हसेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या कुटुंबीयांनी दर्शन घेतले. यासोबतच गावकऱ्यांची सदीच्छा भेट घेतली. या वेळी ज्येष्ठ नेते कान्हाशेठ ठाकूर, म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर, अरुण ठाकूर, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र ठाकूर, स्वप्नील ठाकूर, भार्गव ठाकूर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : न्हावा येथील गावदेवीची यात्रा पालखी सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात गावकऱ्यांनी केला. या वेळी न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, ग्राम सुधारक मंडळाचे अध्यक्ष गजानन म्हात्रे व उपाध्यक्ष मोरेश्वर पाटील, चंद्रकांत पाटील, तुषार भोईर आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.**

# करंजाडे येथे विजेचा लपंडाव; रात्रीचा विद्युतपुरवठा खंडित

**लाईनमनच्या उद्धट उत्तरांमुळे संतप्त नागरिक रस्त्यावर**



**पनवेल : प्रतिनिधी**

करंजाडे सेक्टर २, ३, व ४ मध्ये चार दिवस रोज रात्री वीज जात आहे. त्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी फोन केल्यावर लाईनमन म्हणतो झोप आता तुलाच त्रास होतो का? त्यामुळे मंगळवारी (दि. ११) रात्री संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले. पहाटे अधिकाऱ्यांनी येऊन वीजपुरवठा सुरळीत केला.



करंजाडे परिसराला आवश्यक असलेली यंत्रणा येथील सबस्टेशनला आहे, पण येथील अभियंता कवटे यांनी वीजेचा आवश्यक दाब ठेवण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे रोज रात्री वीज जाऊन नागरीक हैराण झाले होते. तक्रार केल्यावर लाईनमनची उद्धट उत्तरे यामुळे संतप्त नागरीक सरपंच मंगेश शेलार, भाजपचे उत्तर रायगड सरचिटणिस विनोद साबळे शहर अध्यक्ष मिहेंद्र शहारे, ग्रामपंचायत सदस्य अतिष साबळे, सुरज शेलार, शशिकांत शेळके यांचेसह रस्त्यावर आले.

**महावितरणचे अभियंता कवटे यांच्या दुर्लक्षामुळे अनेक नागरीकांच्या इलेक्टॉनिक्स वस्तूंचे नुकसान झाले. वर्क फॉर्म होम वाल्यांनाही त्याचा फटका बसला. त्यामुळे अशा अधिकाऱ्याची तत्काळ बदली करावी; अन्यथा आम्हाला आंदोलन करावे लागेल.**
**-विनोद साबळे, भाजप उत्तर रायगड सरचिटणीस**

**सध्या आय.पी.एल मॅच संपल्यावर एकदम एसी सुरू होतात. त्यामुळे लोड वाढतो. त्यावेळी संबधीत कर्मचाऱ्याने लक्ष दिले नाही. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. आता तात्पुरते रणजीत देशमुख यांना आणून काम केले आहे त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. आम्ही लवकरच या भागाचा सर्वे करून योग्य त्या उपाय योजना करणार आहोत.**
**-देविदास बैकर, अतिरीक्त कार्यकारी अभियंता, महावितरण**

महावितरणचे अतिरीक्त कार्यकारी अभियंता देविदास बैकर यांनी तेथे येऊन दूसरे अभियंता रणजीत देशमुख यांचेसह पहाणी करून वीजेच्या दाबाचे सेटींग वाढवल्यावर वीजआली. बुधवारी (दि. १२) सकाळी लोकप्रतिनीधींनी त्यांची कार्यालयात भेट घेऊन अभियंता कवटे यांचे दुर्लक्षामुळे वीज ग्राहकांचे नुकसान झालेच, पण कंपनीची प्रतीमाही खराब झाली असल्याने त्यांचेवर कारवाईची मागणी केली.

## निवडक

### बसच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**पनवेल :** खाजगी बसच्या धडकेने एका पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. १२) सकाळी पनवेल शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ घडली आहे. पादचारी अमीन मोहम्मद अन्सारी हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोरील रस्ता ओलांडीत होते. या वेळी एका खासगी बसची त्याला धडक बसली. या धडकेत अमीन अन्सारी याचा गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### मंगळसूत्र हिसकावून चोरटा पसार

**पनवेल :** भाजीपाला खरेदीसाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील ५० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी हिसकावून पसार झाल्याची घटना कळंबोलीमध्ये घडली आहे. याप्रकरणी अज्ञात दुचाकीस्वारांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. कळंबोली सेक्टर ८ मध्ये राहणाऱ्या प्रभावती राजे यांचा राजे ह्या पतीसोबत भाजीपाला व फळे विकत घेण्यासाठी मार्केटमध्ये गेल्या होत्या. भाजीपाला विकत घेत असताना मोटरसायकलवरून आलेल्या चोरट्यांनी गळ्यातील सव्वातोळे वजनाचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढला. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात अज्ञात दुचाकीस्वारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### ब्रिजखाली आढळला मृतदेह

**पनवेल :** नवीन पनवेल येथील ब्रिजखाली एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करत आहे. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ५५ ते ६० वर्ष असून त्याची उंची पाच फूट सहा इंच, अंगान मजबूत, वर्ण सावळा, चेहरा गोल, डोक्यास केस काळे व पांढरे विस्कटलेले, दाढी वाढलेली, मिशी फ्रेंच कट पांढरी, चेहऱ्यावर उजवा भाग काळा पडलेला आहे. तसेच त्याने अंगात गुलाबी मळकट फुल बाह्याचा शर्ट व निळी मळकट हाफ पॅन्ट घातलेली आहे. व्यक्तीबाबत किंवा त्याच्या नातेवाईकांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण

**पनवेल :** तालुक्यातील चिखले गावातील एका १६ वर्षीय अल्पवयीन तरुणीचे अज्ञात व्यक्तीने काहीतरी अमीश दाखवून तिच्या कुटुंबीयांच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेले आहे. या मुलीचा रंग गोरा, केस काळे लांब, डोळे काळे, बांधा सडपातळ, नाक सरळ असून अंगात पोपटी टॉप व काळी लेगीज घातलेली घातलेली आहे. तरी याबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे (९८९२८४९२६२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कामोठ्यात महिलेचा पतीकडून खून



### आरोपी कोल्हापूर येथून ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथे राहणाऱ्या एका महिलेच्या डोक्यावर वार करून खून केल्याची घटना घडली होती. याबाबत मयत महिलेच्या भावाने याविषयी कामोठे पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दिली असून तिच्या पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष दोनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आलेल्या विशेष पथकाने हत्या करणाऱ्या पाटील अटक केली आहे.

कामोठे येथील त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स, रूम नंबर ४०१, सेक्टर ११, येथे बिरप्पा श्रीरंग शेजाळ याने त्याच्या पत्नीच्या डोक्यात कोणत्यातरी जड व टणक वस्तू डोक्यात मारून तिचा अत्यंत निर्घृण पद्धतीने खून केला असल्याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील आरोपी हा गुन्हा करून जागेवरच मोबाईल बंद करून गुन्ह्यात वापरलेल्या हत्यारसह फरार झाला होता. त्यामुळे वरिष्ठांनी सदर गुन्ह्यातील आरोपीस तत्काळ ताब्यांत घेण्याबाबत आदेशित केले होते. त्यानुसार पोलिसांच्या विशेष पथकाने सीसीटीव्ही कॅमेरे तसेच तांत्रिक तपासच्या आधारे आरोपी हा आदमापुर (ता. भुदरगड, जि. कोल्हापूर) येथे लपवून राहत असल्याचे निष्पन्न झाले होते. या ठिकाणीं तत्काळ पथक रवाना झाले व आरोपीला शिताफीने ताब्यात घेतले.

पोलिसांनी गुन्ह्याची चौकशी केली असता, त्याने पत्नीशी वारंवार होणाऱ्या घरगुती वादातून रागाच्या भरात डोक्यात हातोडी मारून तिचा खून केला कबुली दिली आहे. आरोपीची वैद्यकीय तपासणी करून पुढील कार्यवाहीकामी कामोठे पोलीस ठाणे याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# पनवेल महापालिकेतर्फे निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा



**पनवेल : वार्ताहर, प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने ११ एप्रिल रोजी निबंध व वक्तृत्व स्पर्धेचे लोकनेते दि. बा. पाटील पनवेल महापालिका शाळा क्र. ०१ येथे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांचा व नागरिकांचा उत्फुर्त प्रतिसाद मिळाला.

इयत्ता पाचवी ते सातवी, इयत्ता आठवी ते बारावी, खुला गट अशा तीन गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धांचे उद्‌घाटन महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या वेळी महापालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी किर्ती महाजन, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जन्म-मृत्यू विभाग प्रमुख हरेश जाधव, मुख्याध्यापिका अनुपमा डामरे, शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

तीन गटात घेतल्या गेलेल्या या स्पर्धेला महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळांचा व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामधील निबंध स्पर्धेत एकुण ३२ तर व वक्तृत्व स्पर्धेत ३३ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झालेल्या या स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे तसेच स्पर्धेतील सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# करंजाडेत दारूविक्रीला परवाना न देण्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीमध्ये वाईन शॉप व मद्य विक्रीला परवानगी देऊ नये याबाबत आरपीआय शहर अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी सरपंच मंगेश शेलार आणि उपसरपंच सागर आंग्रे यांना निवेदन दिले आहे.

करंजाडे सेक्टर ३ येथे स्मिता वाईन शॉप सुरू आहेत. करंजाडे गाव व करंजाडे नोड येथील नागरिकांचा वाईन शॉप व मद्य विक्रीला विरोध आहे. या दारुच्या दुकानामुळे आपल्या गावातील तरुण मुले व्यसनाधिन होतील. त्यामुळे



(छाया : अक्षय शार्दुल)

याचा गांभीर्याने विचार करुन दारु बंदीला परवानगी देऊ नये, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देते वेळी आरपीआयचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष शरद पाटील, वाकडी विभागीय अध्यक्ष प्रवीण गायकवाड उपस्थित होते.

## संपादकीय

# ड्रॅगनच्या कुरापती

चीनी वर्चस्ववाद आणि विस्तारवादाला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पायबंद घातला हे विरोधकांनाही मान्य करावे लागेल. चीनच्या डरकाळ्यांना भीक न घालता गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांना ठणकावले. त्यानंतर आता अधिक सावध राहिले पाहिजे.

**अरुणाचल प्रदेशातील सीमावर्ती गावात जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी चीनला खणखणीत शब्दांत खडसावल्यानंतर शेजारील राष्ट्राकडून कडवट प्रतिक्रिया येणे अपेक्षितच होते. एक इंच जमिनीवर देखील अतिक्रमण होऊ देणार नाही, असा इशारा शाह यांनी चीनला दिला. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भूभाग आहे. तेथील समाज आणि संस्कृती यांची पाळेमुळे भारतीय संस्कृतीतच मिसळून गेलेली आहेत याची जाणीव त्यांनी चीनला करून दिली हे बरेच झाले. कारण गेले काही दिवस सातत्याने अरुणाचल प्रदेशच्या संदर्भात कुरापती काढण्याचा उद्योग चीनने सुरू केला आहे. इटानगर ही अरुणाचल प्रदेशाची राजधानी. तेथे भारताने जी२० परिषदेतील एका सत्राचे आयोजन केले होते. शेजारील राष्ट्र असूनही चीनचा प्रतिनिधी या सत्रात गैरहजर राहिला. इतकेच नव्हे तर त्याच सुमारास चीनने या भागातील काही नद्या, पर्वत आणि गावे यांची नावे परस्पर बदलून टाकली. अरुणाचल प्रदेश हा तिबेटचा दक्षिण भाग असल्याचा दावा चीनकडून नेहमीच केला जातो. या राज्यात कोणीही सरकारी अधिकारी किंवा मंत्री यांनी दौरा केला की ड्रॅगनचे फुत्कार ठरलेलेच असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सूत्रे २०१४ मध्ये स्वीकारल्यानंतर ईशान्येकडील राज्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात जोडण्यासाठी मोठे प्रयत्न सुरू केले. मुख्य म्हणजे तेथील दुर्गम भागात पायाभूत सुविधा उभ्या करण्याचा सपाटा लावला. आजही तेथे अनेक विकास प्रकल्पांची कामे वेगाने सुरू आहेत. २०१४ नंतर पंतप्रधान मोदी यांनी आपल्या केंद्रीय मंत्रिमंडळातील कुणी ना कुणी मंत्री ईशान्येच्या राज्यात दौरे करतील असे पाहिले. महिन्यातून किमान एकदा तरी ईशान्येतील राज्यांमध्ये जावे असा दंडकच त्यांनी घालून दिला. तेथील बंडखोरी जवळपास संपुष्टात आणली. रोजगारनिर्मितीसाठी ईशान्येतील बांधवांना अन्यत्र स्थलांतरित व्हावे लागणार नाही यासाठी नवनवे उपक्रम सुरू केले. केंद्र सरकारने सध्या 'व्हायब्रंट व्हिलेज' कार्यक्रमाअंतर्गत ईशान्य भारतातील गावांच्या सर्वांगीण विकासाची कामे हाती घेतली असून पहिल्या टप्प्यासाठी ६६२ गावांची निवड करण्यात आली आहे. त्यात अरुणाचल प्रदेशातील ४५५ गावांचा समावेश आहे. भारताने विकासाची एवढी प्रचंड मोहीम ईशान्येत उघडल्याचे पाहून चीनी ड्रॅगनचे पित्त खवळणे साहजिकच होते. २०१४ सालापर्यंत या भागातील परिस्थिती फार वेगळी होती. बंडखोरीमुळे ईशान्य भारत हिंसाचाराने धगधगत होता. याच भागात चीनतर्फे इमारती बांधल्या जात होत्या. आता पारडे उलटले आहे. सीमाभागातील शांततेवर तुम्ही घाला घालत आहात असा उलटा कांगावा चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने केला आहे. वरकरणी आंतरराष्ट्रीय पातळीवर चीनी सत्ताधारी शांतता करारांची आणि सलोख्याची भाषा करतात. परंतु प्रत्यक्षात असले करार-मदार पायदळी तुडवण्याची चीनची जुनी खोड आहे. भारत आता पहिल्यासारखा सहनशील राष्ट्र राहिलेला नाही याची जाणीव चीनी राज्यकर्त्यांना एव्हाना झाली असणारच. अर्थात कागाळ्या करण्याचे उद्योग ते काही सोडणार नाहीत. कारण असल्या विस्तारवादी उद्योगांनाच ते परराष्ट्रधोरण म्हणतात. चीनला सडेतोड उत्तर दिल्याबद्दल गृहमंत्री शाह यांच्या बाणेदारपणाला प्रत्येक भारतीयाने दाद द्यायला हवी.**

# स्वातंत्र्यसैनिकांची उपेक्षा होऊ नये

## खबरबात
शैलेश पालकर

गेल्या वर्षी पोलादपूर तालुक्यातील स्वातंत्र्यसंग्रामामध्ये नावाजलेल्या व्यक्तीमत्वाचे दीर्घ आजाराने निधन होऊन एक वर्ष होत आले. जगन्नाथ दाजी जाधव यांची स्वातंत्र्य सैनिक म्हणून पोलादपूर अथवा रायगड जिल्ह्यामध्ये बऱ्याच नागरिकांना ओळख नव्हती, मात्र त्यांचे दीर्घकाळ वास्तव्य होते. त्यांच्या एकूण कारकिर्दीबाबत अनेक वृत्तपत्रांतून सविस्तर माहिती प्रसिध्द होऊनही तत्कालीन प्रशासन अनभिज्ञ राहिले. स्वात्रंत्र्यसैनिकांबाबत पुन्हा असा हलगर्जीपणा होऊ नये, याबाबत प्रशासनाने विशेष दक्षता घेण्याची गरज आहे.

पोलादपूर तालुक्याच्या गावांत वाई गंगापूरी भागातून भटक्या समाजाचे काही लोक इंग्रजांनी बांधलेल्या 'फिटझगेराल्ड'म्हणजे आंबेनळी घाटातून व्यापारासाठी येत असत. साधारणत: विसाव्या शतकाच्या सुरूवातीस दाजी आणि सिधू असे दोघे भाऊ ॲल्युमिनियमची भांडी, मोती, मणिपोत, बांगड्या असा कटलरीचा व्यापार करण्यासाठी वडील काळूराम जवारी यांच्यासोबत आले. सिधू दारूच्या व्यसनामुळे काही काळ परागंदा झाला तर मोठा दाजी पोलादपूरमध्ये स्थिरावला. दाजी जवारी यांना दोन पत्नींपासून आठ अपत्यं होती. त्यापैकी जगन्नाथ हे तिसरे पुत्र होत. त्यांचे जवारी हे आडनांव दुसऱ्या पिढीत गोसावी तर सध्याच्या पिढीत जाधव असे परिचित झाले आहे. सातवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर १९४५ साली ते सिंधूदूर्ग कणकवलीतील गोपूरी येथे आप्पासाहेब पटवर्धन यांच्याकडे काही काळ वास्तव्यास होते. तेथे आप्पासाहेबांनी त्यांचा परिचय गोविंद पवार, तडलगी यांच्यासमवेत करून जगन्नाथ जाधव यांना निझामाने देश स्वतंत्र होऊनही हैद्राबाद संस्थान विलीन करण्यास विलंब चालविल्याबद्दल माहिती दिली. जळकोट येथील कृष्णकांत चौधरी आणि उमरगा येथील अप्पासाहेब पाटील यांच्यासमवेत हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभागी होण्यासंदर्भात आप्पासाहेब पटवर्धन यांनी केलली सूचना जगन्नाथ दा.जाधव यांना मनापासून पटली. यामुळे त्यांनी हैद्रबाद मुक्ती संग्रामामध्ये प्रत्यक्षरित्या सहभाग घेऊन भूमिगत होत तेथील पोलीस चौकी उद्ध्वस्त करणे, महत्वाचे संदेश व कागदपत्रे यांची ने-आण करणे, सिंधी झाडे तोडणे, भूमिगतांना जेवणाची शिदोरी पोहोचविणे, अशी विविध कामे केली. यामागे प्रेरणास्त्रोत असलेले देशाचे पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेले



आवाहन जगन्नाथ जाधव यांच्या आजही स्मरणात आहे.

१९४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्यानंतर हैद्राबाद मुक्ती संग्राम ऐन संघर्षाच्या पावित्र्यात आला असताना जगन्नाथ जाधव यांनी सातत्याने सर्व भूमिगतांना सहकार्याची भूमिका घेतली. त्यामुळे त्यांच्या नावाचे वॉरण्ट निघाले. मात्र, ते चलाखीने भूमिगत राहिल्याने पोलीसांच्या हाती कधीही लागले नाहीत.१३ सप्टेंबर १९४७ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांनी हैद्राबाद संस्थान खालसा करून तेथे तिरंगा फडकाविण्याचा हूकूम जारी केला आणि सर्व भूमिगत नेते-कार्यकर्ते कार्यपूर्तीमुळे हजर झाले. हैद्राबादच्या जेलरने जगन्नाथ दा. जाधव यांना वॉरण्ट सर्टिफिकेट सोपविले. या देशसेवेमुळे हैद्राबाद संस्थान भारतात विलीन झाले.

जगन्नाथ दा. जाधव यानंतर परत जन्मगावी पोलादपूर येथे आले. परंतू, त्यांना कुटूंबियांनी परत मुंबईला धाडले. तेथे दादर भातबाजारातील व्यापारी देवशी चणा यांच्या दुकानात व घरी चाकरी केली. त्यानंतर मशीद बंदरच्या मेवा व्यापारी रघुनाथ देवजीकडे नोकरी पत्करली. येथे जगन्नाथ दा.जाधव यांनी गुजराथी भाषा अवगत केली. पिंगेज क्लासेसमध्ये शिकून रात्रशाहेत नांव टाकले. मॅट्रीकपर्यंत शिकून जयहिंद सिनेमाजवळ शिकवणी वर्ग सुरू केले. मास्तर अशी ओळख निर्माण झाली. याकाळात नाथ जोगी समाजातील असंख्य लोकांशी संपर्क वाढला आणि परंलच्या कामगार मैदानात समाजाची १९६० साली सभा झाली. यात सिंधुदूर्गचे विश्वनाथ हटकर यांनी जगन्नाथ दा. जाधव यांचे अध्यक्ष पदासाठी नांव सुचविले तर विश्वनाथ भाऊ तपकिरे यांनी अनुमोदन दिले. यांनतर महाराष्ट्रातील नाथजोगी समाजामध्ये ऐक्याची भावना निर्माण करून समाज मंडळांची ठिककिाणी तालुका व जिल्हावार रचना करण्याकामी जगन्नाथ दा. जाधव यांनी प्रवृत्त केले. याकाळात खादी बोर्डाचे अध्यक्ष वैकुंठलाल मेहता, यू.एन.ढेबर, सी. रामचंद्रन, पुरूषोत्तम कानजी यांनी जगन्नाळा दा.जाधव यांची देशसेवा विचारात घेऊन १९५६ मध्ये टेक्नीकल चेकर पदावर सेवेत घेतले. यामुळे नोकरी सांभाळून समाजसेवेचे व्रत सुरू ठेवावे लागले. यादरम्रान १९५९ मध्ये वडील दाजी व आई कृष्णामाई यांनी जगन्नाथांचा विवाह शकुंतला हिच्यासमवेत करून दिला. विवाहानंतर पत्नीने लालबाग येथे दुकान सुरू केले आणि नोकरी सांभाळून जगन्नाथ जाधव समाजाची सभासाद नोंदणी करण्यास वेळ देऊ लागले.सर्व समाजधुरिणांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात फिरून नाथ संप्रदाय, नवनाथ संप्रदाय, नाथ जागी, फासेपारधी अशा सर्व भटक्या समाजाला एकत्र करण्याचे काम सुरू केले. हरिजन, गिरीजन, कातकरी, कैकाडी, कोल्हाटी, गोसावी, जवारी, डौरी, बाबा, बेलदार आणि सर्व भटका समाज एकत्र करण्यात काहिसे यश आल्यानंतर दिल्ली येथे अखिल भारतीय मागास परिषदेचे अध्यक्ष काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखालील परिषदेस जगन्नाथ दा. जाधव यांनी प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रातून पाठविण्यात आले. तेथे त्यांनी भाषणातून पोटासाठी सवत्र संचार करणाऱ्या समाजाची दखल घेऊन त्यांची शेड्युल ट्राईब्ज अनुसुचित जाती जमातीमध्ये नोंद व्हावी, अशी मागणी करण्यास काकासाहेब कालेलकर यांच्या समोर केली. त्यानुसार कालेलकर यांनी केंद्रीय समाजकल्याणमंत्री सीताराम केसरी यांच्यासमोर तशी शिफारस केली. येथून या भटक्या विमुक्त समाजाला उत्कर्षाची संधी प्रात झाली.

जगन्नाथ जाधव यांना त्यांच्या देशसेवेबद्दल स्वातंत्र्यसैनिक पुरस्कार तर सामाजिक कार्याबद्दल तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व वसंतराव नाईक यांनी जस्टीस ऑफ पीस (जेपी) पदवी देऊन सन्मानित केले. यानंतर जगन्नाथ दा. जाधव हे काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांनी थोर समाजसेविका डॉ. उषा मेहता यांचे सचिव म्हणून जबाबदारी स्विकारली. त्यांच्या अखेरपर्यंत सोबत करताना शिक्षण, समाजजागृती, बालवाड्या, स्त्रीमुक्ती चळवळ, व्यसनमुक्ती, अपंग संस्था, महिला संस्था, अनाथ संस्थांसाठी महत्वपूर्ण योगदानही दिले. महाराष्ट्राबाहेर हैदराबादपर्यंत देशसेवा केल्यानंतर समाजसेवेचे व्रतही दिल्ली, मेरठ,मडगांव-गोवा येथेवर पोहोचविले. याकाळात महाराष्ट्र राज्य हरिजन वेल्फेअर ॲडव्हायजरी बोर्ड सल्लागार सदस्य, नेताजा सुभाषचंद्र बोस पुरस्कार-उत्तरप्रदेश मेरठ, बृहन्मुंबईमध्ये विशेष कार्यकारी दंडाधिकारी, आझादी एक्सप्रेस रेल पुरस्कार, विजिलन्स कमिटी मुंबई सदस्य, महाराष्ट्र राज्य प्रांतिक काँग्रेस कमिटी जनरल सेक्रटरी अशी अनेक पदे भूषविली. डॉ. उषा मेहता यांच्यासमवेत राष्ट्रीय नेत्यांच्या संपर्कात येण्याची संधी त्यांना लाभली.

मुंबई येथून गेल्या काही वर्षांपूर्वी स्वातंत्र्यसैनिक जगन्नाथ दा. जाधव पोलादपूर येथील छोटयाशा घरात त्यांच्या पत्नींसमवेत वास्तव्यास आहेत. त्यांच्या या अफाट देशसेवेची आणि विशाल समाजसेवेची पोलादपूर तालुक्याला अथवा रायगड जिल्ह्याला माहिती नाही. कुलाबा येथील मिलीटरी हॉस्पीटलमध्ये ३ मे २०२२ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी रात्री पोलादपूर येथे त्यांच्या जन्मगांवी अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलादपूर तहसिल कार्यालयमध्ये त्यांची स्वात्र्यसैनिक अशी नोंद नसल्याने प्रशासनाने शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होऊ शकले नाहीत.

## बदलते तंत्रज्ञान

# आता चष्म्यात कॉलिंगसह गाणी ऐकायचीही सोय




टेक्नोलॉजी दिवसेंदिवस इतकी विकसित होत आहे की, कधी काय नवी येईल? हे सांगता येत नाही. आता हेच बघाना शाओमी कंपनीनं एक खास असा चष्मा बाजारात आणलाय जो चष्म्याचे काम करतोच शिवाय तो घालून तुम्ही कॉलवर बोलू शकता आणि सोबतच गाणीही ऐकू शकता. तर शाओमीने त्यांच्या स्मार्ट वेयरेबल्स कॅटेगरीत हा शाओमी मिजीया स्मार्ट ऑडिओ ग्लासेस (Xiaomi Mijia Smart -udio Glasses) प्रोडक्ट आणला आहे. सध्यातरी याची किंमत ७९९ युआन म्हणजेच भारतीय रुपयांमध्ये जवळपास नऊ हजार ५०० रुपये इतकी आहे. विशेष म्हणजे या चष्म्याचं वजन केवळ ३८.१ ग्रॅम इतकं असून डिझाईनही अगदी स्टायलिश आहे.

यात ओपन साऊंडफिल्ड, डबल ॲंटि लिकेज, नॉईस रिडक्शन, अधिकची बॅटरी लाईफ, ड्युअल डिव्हाईस कनेक्श आणि दोन्ही बाजूंना अल्ट्रा लॉंग टच असे फीचर्स दिले गेले आहेत. हे ऑडिओ ग्लासेस 128mm दोन अल्ट्रा डायनॅमिक बॅलेन्स युनिटसह, एक SBS2.0 डबल सस्पेशन बॅलेन्स स्ट्रॅक्चर आणि एक भारी साऊंड एक्स्पिरियन्ससाठी साऊंड सराउंड एल्गोरिदम देण्यात आला आहे. या ग्लासेसमध्ये ड्युअल-मायक्रोफोन बीम एआय प्रणाली कॉलिंगदरम्यान नॉईस रिडक्शनसाठी दिली गेली आहे.

कंपनीने असाही दावा केला आहे की, संपूर्ण चार्जमध्ये हे स्मार्ट ग्लासेस सात तास सलग कॉलिंगचा आणि १० तास सलग गाणी ऐकण्याइतकी बॅटरी लाईफ देतात. २२ तासांची डेली बॅटरी लाईफ हे ग्लासेस देत असल्याचंही कंपनीचं म्हणणं आहे. तसंच ग्लासच्या दोन्ही बाजूंना ३० मिमीपर्यंत लांब असा टच एरिया देण्यात आला आहे. ज्याला लॉंग प्रेस करताच व्हाईस असिस्टंट फीचरला ॲक्टिव्ह केलं जाऊ शकतं. तर हा दमदार असा Mijia स्मार्ट ऑडिओ ग्लास मॅन्युवल स्विचिंगशिवाय ड्युअल डिव्हाईस कनेक्शनलादेखील सपोर्ट करतो. ज्यामुळे या प्रोडक्टला एकाच वेळी दोन ब्ल्यूटूथना कनेक्ट करता येईल. विशेष म्हणजे यामध्ये फायडिंग ग्लास, वियरिंग डिटेक्शन, IP54 रेटिंग (डस्टप्रूफ आणि वॉटरप्रूफ) असे फिचर्स दिले गेले आहेत.

# प्रसिद्ध वैद्यकशास्त्रज्ञ वसंत रामजी खानोलकर



## विशेष

वसंत रामजी खानोलकर यांचा जन्म १३ एप्रिल १८९५ रोजी कोकणातील एका छोट्या खेडेगावात एका गोमंतक मराठा समाजातील सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे वडील रामजी धोंडो खानोलकर एक प्रतिष्ठित शल्यचिकित्सक होते. कंदाहारला गेलेल्या लॉर्ड रॉबर्टच्या विजयी सैन्यासोबत परतताना क्वेट्टा येथे ते विश्रांतीसाठी थांबले. तेव्हा क्वेट्टाचे वातावरण आणि परिसर रामजींना एवढे आवडले की त्यांनी तेथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. दुर्दैवाने १९३५च्या भयानक भूकंपात रामजी आणि त्यांच्या परिवारातील १४ जण मृत्युमुखी पडले.

रामजींचा वैद्यकीय वृत्तीसोबतच संस्कृत भाषेचा गाढा अभ्यास होता. त्यांच्याकडे अनेक मूल्यवान आणि दुर्मिळ पुस्तकांचा संग्रह होता. बहुधा वसंत खानोलकरांना वैद्यक आणि भाषा या विषयांची आवड वडिलांकडूनच मिळाली असावी. वसंत खानोलकरांनी लहानपणीच डॉक्टर व्हायचे ठरवले होते. वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी मुंबईच्या ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. येथेच ते सी. जी. पंडित यांना पहिल्यांदा भेटले. त्याच वर्षी ते इंग्लंडला रवाना झाले. लंडन विद्यापीठातून त्यांनी विज्ञान शाखेची पदवी संपादन केली आणि १९१८मध्ये वैद्यकीय पदवी मिळवली. १९२३ मध्ये ते रोगनिदानशास्त्रात (पॅथॉलॉजी) एम.डी. झाले. या काळात त्यांनी मूलभूत विज्ञान आणि वैद्यकीय संशोधनात अमूल्य अनुभव मिळवला. ते सर्वांत कमी वयाचे ग्रॅहम रिसर्च स्कॉलर होते.

भारतात परत येऊन ते ग्रान्ट मेडिकल कॉलेजमध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना रोगनिदानशास्त्र शिकवू लागले. शिक्षणासाठी उपयुक्त विविध नमुन्यांचे संग्रहालय त्यांनी सुरू केले. रोगनिदानशास्त्राच्या पद्धतशीर शिक्षणाची सुरुवात त्यांनी केली. रोगनिदानशास्त्रातील संशोधनावरही त्यांनी विशेष भर दिला. पाश्चात्य देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या तुलनेत भारतीय शिक्षण कमी पडू नये म्हणून त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमात अनेक बदल सुचवले. वैद्यकीय शिक्षणामध्ये मूलभूत विज्ञान, प्रायोगिक जीवशास्त्र, जीवरसायनशास्त्र, जीवभौतिकशास्त्र तसेच संख्याशास्त्र यांचे महत्त्वाचे स्थान त्यांनी ओळखले होते. हे तत्त्वज्ञान त्यांनी त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये पसरविण्याचा प्रयत्न केला. खानोलकरांनी रोगनिदानशास्त्राचे शिक्षक या नात्याने या विषयाच्या अभ्यासाला त्यांनी नवीन दिशा दिली. खानोलकरांनी सेठ जी. एस. मेडिकल महाविद्यालय व के. ई. एम. रुग्णालयात कामाच्या एका वेगळ्या परंपरेची सुरुवात केली. जैवभौतिकी, उपयोजित जीवशास्त्र इत्यादी विषयांची सुरुवात त्यांनी मुंबई विद्यपीठात केली. या कालावधीत खानोलकरांना कर्करोग आणि कुष्ठरोग यांच्या अभ्यासामध्ये विशेष कुतूहल व आवड निर्माण झाली. तेव्हा त्यांनी शिक्षकी पेशातून अंग काढून घेतले आणि टाटा मेमोरियल रुग्णालयात प्रमुख रोगनिदानतज्ञ म्हणून १९४१ मध्ये ते रुजू झाले. त्यांनी कर्करोग, कुष्ठरोग, पुनरुत्पादनाचे शरीरशास्त्र, मानवी अनुवंशशास्त्र या विषयात संशोधन केले.

भारतात वैद्यकीय संशोधन सुरू करण्याचे श्रेय खानोलकर व त्यांचे जवळचे मित्र सी. जी. पंडित आणि बी. बी. दीक्षित यांना जाते. खानोलकर अनेक भाषा पारंगत होते. भारत सरकारने खानोलकरांना पद्मभूषण देऊन गौरविले. ते इंडियन सोसिएशन ऑफ पॅथॉलॉजी अँड मायक्रोबायोलॉजी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, इंटरनॅशनल कॅन्सर रिसर्च कमिशनचे अध्यक्ष, इंडियन कॅन्सर रिसर्च सेंटरचे निदेशक, कर्करोग आणि कुष्ठरोगावरील जागतिक आरोग्य संघटनेच्या समितीचे सदस्य आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू होते. नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेसने खानोलकरांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वक्तृत्व स्पर्धा सुरू केली. कर्करोग आणि कुष्ठरोग यावर त्यांनी तीन पुस्तके आणि शंभरहून जास्त शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. खानोलाकरांचा मृत्यू २९ ऑक्टोबर १९७८ रोजी मुंबईत रुग्णालयात झाला.

**(साभार : महाएनएमके)**

## क्लिक...क्लिक...!



**उरण : सध्या सर्वत्र शाळेला उन्हाळी सुट्ट्या असल्याने पीरवाडी बीचवर नागरिकांनी गर्दी केली होती.**

## आरोग्य प्रहर



# व्हिटॅमिन बी असलेले 'हे' शाकाहारी पदार्थ!

सर्व पोषक घटकांप्रमाणेच व्हिटॅमिन बीदेखील आपल्या शरीरासाठी खूप महत्वाचे आहे, त्याशिवाय शरीराला अशक्तपणा, थकवा, आळस, अंगदुखी, हात-पाय सुन्न होणे, ऊर्जेची कमतरता यांचा सामना करावा लागू शकतो. व्हिटॅमिन बी मिळवण्यासाठी तुम्हाला मांस, मासे, अंडी आणि चिकन सारख्या गोष्टी खाव्या लागतात असे सर्वसाधारणपणे मानले जाते, परंतु सत्य हे आहे की शाकाहारी पदार्थ खाऊन देखील आपण हे पोषण मिळवू शकता. अशाच शाकाहारी पदार्थांवर एक नजर टाकूया.

**व्हिटॅमिन बी असलेले शाकाहारी पदार्थ**

**शेंगदाणे** - प्रथिनांची गरज भागवण्यासाठी काळे चणे, हिरवे वाटाणे, चणे आणि राजमा यासारख्या गोष्टी खाल्ल्या जातात, परंतु तुम्हाला माहित आहे का की शेंगदाणे देखील व्हिटॅमिन बी चा चांगला स्त्रोत मानले जातात. त्यामुळे त्यांचे सेवन अवश्य करावे.

**दूध** - दूध हे एक संपूर्ण अन्न आहे कारण त्यात सर्व प्रकारचे पोषक घटक असतात, व्हिटॅमिन बी चा ही चांगला स्त्रोत आहे, पनीर, चीज सारख्या दुग्धजन्य पदार्थांचा वापर केल्यास आपल्याला देखील फायदा होईल. शाकाहारी लोकांना जरी दूध आवडत नसेल तरी त्यांच्यासाठी बरेच पर्याय आहेत.

**सूर्यफुलाचे बी** - आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जातात, ते शिजवून खाल्ले जाऊ शकतात किंवा त्यातून निघणारे तेल स्वयंपाकाचे तेल म्हणूनही वापरले जाते. हे व्हिटॅमिन बी, नियासिन आणि फोलेटचा समृद्ध स्त्रोत आहे.

**हिरव्या पालेभाज्या** - हिरव्या पालेभाज्या नेहमीच आरोग्यासाठी उत्तम अन्न मानल्या जातात, लोहासोबतच व्हिटॅमिन बी देखील यात आढळते. पालकाच्या हिरव्या भाज्या रोजच्या आहारात खाऊ शकता. हिरव्या पालेभाज्यांचा रस सुद्धा तुम्ही पिऊ शकता. भाजी बनविण्याआधी हलक्या गरम पाण्याने भाजी धुवावीत, जेणेकरून जंतू नष्ट होतील.

**(दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# अधिकारी, कंत्राटदाराला धरले धारेवर

## रस्त्याचे काम निकृष्ट; माजी आमदार धैर्यशील पाटीलांनी विचारला जाब

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात येत असलेल्या नांदगाव ते गोमाशी रस्त्याचे काम अतिशय दर्जाहिन होत असल्याची तक्रार गोमाशी ग्रामस्थांनी माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्याकडे केली होती. ग्रामस्थांच्या तक्रारीवरून मंगळवारी (दि.११) धैर्यशील पाटील यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन या कामाची पाहणी केली. या वेळी पाटील यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता, अधिकारी व कंत्राटदाराला चांगलेच धारेवर धरले. त्यांची खरडपट्टी काढली.

या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी धैर्यशील पाटील यांना ज्या ज्या ठिकाणी निष्कृष्ट दर्जाचे काम झाले आहे ते काम निदर्शनास आणून दिले.

ग्रामस्थांनी सांगितले की, नांदगाव ते गोमाशी या रस्त्याचे काम सुरू आहे. सुमारे १० वर्षांनंतर दुरवस्था झालेल्या या रस्त्याच्या कामास सुरू करण्यात



आली आहे. त्यामुळे हे काम दर्जेदार व्हावे, ज्या ठिकाणी निष्कृष्ट दर्जाची कामे झाली आहेत ती कामे तत्काळ दुरूस्त करून घ्यावी. पावसाळ्याच्या आतमध्ये रस्त्याचे काम पूर्ण व्हावे, अशी मागणी उपस्थित ग्रामस्थांनी धैर्यशील पाटील यांच्याकडे केली.

धैर्यशील पाटील यांनी या वेळी संबंधित अधिकाऱ्यांना कामाचा योग्य तो दर्जा राखण्याचे व ग्रामस्थांना अपेक्षित असलेले काम करून घेण्याचे निर्देश दिले, तसेच या कामांमध्ये चालढकल व वेळकाढूपणा सहन केला जाणार असे देखील संबंधित अभियंते, अधिकारी व कंत्राटदाराला बजावण्यात आले.

या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, आलाप मेहता, ॲड. सुभाष पाटील, रोहन दगडे, संजोग शेठ, भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यासह मोठ्या संख्येने गोमाशी पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी गोमाशी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी धैर्यशील पाटील यांचे आभार मानले.

> **संबंधित खात्याच्या मंत्र्यांकडे आम्ही सतत पाठपुरावा करून निधी आणतो. यासाठी अथक परिश्रम घेतो, मात्र जेव्हा रस्ता बनतो तेव्हा आमच्याकडे कोणीही रस्ता चांगला झाला हे सांगण्यासाठी येत नाही कारण रस्ता चांगला होतच नाही. त्यामुळे संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी चांगले ठेकेदार निवडावेत व कामावर योग्य देखरेख ठेवावी आणि दर्जेदार काम करून घ्यावे, तसेच जे ठेकेदार चांगले काम करीत नाहीत त्यांच्याकडे काम देऊच नये. मी कधीही कोणताही ठेकेदार घ्या म्हणून सांगत नाही.**
> **-धैर्यशील पाटील,** माजी आमदार, पेण सुधागड रोहा मतदारसंघ.

# रसायनी रोटरी क्लबकडून चौक पालकर विद्यालयाला सोलर पॅनल, संगणक भेट

**चौक, मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी वर्ष २०२१-२२ मध्ये मंजूर झालेल्या ग्लोबल ग्रँट योजनेतील रोटरी क्लब ऑफ रसायनी पाताळगंगा आणि रोटरी क्लब ऑफ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मागणी केलेल्या पाच किलोवेटचे सोलर पॅनल आणि पाच संगणकांचा संच सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर, चौक यांना अर्पण करण्याचा औपचारिक सोहळा बुधवारी (दि.१२) चौक येथे पार पडला.

यानिमित्ताने झालेल्या कार्यक्रमात विद्या प्रसार समिती, चौकच्या शालेय व्यवस्थापन समितीच्यावतीने उपस्थित सर्व रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा सदस्यांचे स्वागत करण्यात आले. त्यांच्या, व्यवस्थापन समिती सदस्य, सर्व शिक्षक बंधु भगिनी यांच्या उपस्थितीत सोलर पॅनलचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.



त्यानंतर झालेल्या सभागृहातील कार्यक्रमात पाच संगणकाचा संच संस्थेच्या उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख आणि शाळेचे मुख्याध्यापकांकडे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक भोमले सर यांनी केल्यावर रो. डॉ.मिलिंद भगत, भावी अध्यक्ष रो. रेश्मा कुरूप, रो. अमित शहा, अध्यक्ष रो. गणेश काळे, माजी अध्यक्ष, यांची समयोचित भाषणे झाली. संस्थेच्या वतीने नरेंद्र शहा आणि ॲड. अविनाश देशमुख यांनी रोटरी क्लबच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली व स्वीकारलेल्या वस्तूंचा योग्य वापर करण्याचे आश्वासन दिले.

या सोहळ्यास रोटरीयन सुनील भोसले, विजय पाटील, बाळकृष्ण होनावळे, संदीप साबळे, ऋतुजा भोसले, मेघा कोरडे, अनुराधा होनावळे, प्रतिक्षा कुरंगळे, मित्तल शाह उपस्थित होते.

# घोड्यांच्या विष्ठेमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

## त्वरीत उपाययोजना करावी; माथेरानच्या माजी नगराध्यक्षांची मागणी

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमध्ये मागील काही वर्षांपासून केवळ मतांच्या राजकारणापायी घोड्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. याच घोड्यांच्या विष्ठेने (लीद) दमा, हृदयविकार कॅन्सरसारखे गंभीर आजार उद्भवतात असे बोलले जात आहे.

झाडांजवळ घोडे बांधल्यास सुध्दा त्यांच्या मलमूत्राणे त्याचप्रमाणे झाडांची साल चावल्यामुळे आजवर अनेक झाडे दगावली आहेत. त्यातच घोड्यांचे तबेले असणाऱ्या पंचवटी नगर भागात घोड्यांच्या लीदीचे ढीग बनलेले असून कुणीही याठिकाणी काही ज्वलनशील पदार्थ टाकल्यास ही लीद हळूहळू पेटून धुमसत राहते. त्यामुळे उग्र वास आणि श्वास कोंडतो परिणामी ही बाब आरोग्यासाठी खूपच घातक असल्याने यावर त्वरीत उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

माथेरान पंचवटीत नगर येथील तबेल्याजवळ लिदीचे प्रचंड दोन ढीग आहेत ज्यामुळे परिसरात धूर आणि दुर्गंधी पसरून प्रदूषण होत असते. दरवेळी उष्णता वाढल्यानंतर किंवा कुणी एखादा ज्वलनशील पदार्थ या लिदीच्या ढिगात टाकल्यानंतर आग लागते आणि ती सारखी धुमसत राहते पूर्ण विझत नाही यासाठी लिदीची व्यवस्थित विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. हे नेहमी सांगूनही निर्णय, उपाय होत नाही ही वस्तुस्थिती आहे. कचरा आणि लिद संकलन करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहन असेल तर जास्त सोयीचे होईल. तत्पूर्वी लिद वाहून नेण्यासाठी हातगाडी वापर सुरू करावी आणि आता जिथून ढिगाऱ्यावर लिद टाकली जाते त्याजागेवर पत्रे लावावे. आपले पर्यावरण वाचवणे हे आपल्याच हातात आहे. हा संदेश नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी आणि कर्मचारी आणि लिद टाकणाऱ्यांनी गांभीर्याने घ्यावा, अशी मागणी केली आहे.

# फास्ट फुडपासून कुटुंब दूर ठेवा -कृषी सहाय्यक मनोज जाधव

## गोळेगणी येथे कृषी विभागामार्फत पौष्टिक तृणधान्य चित्रकला स्पर्धा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आहारातील पोषकतत्व अभावी ग्रामीण व शहरी भागात आजाराचे प्रमाण वाढत असून फास्ट फूडपासून कुटुंब दूर ठेवून पौष्टिक तृणधान्य आहारात समावेश करणे काळाची गरज असल्याचे मत कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी व्यक्त केले.

संयुक्त राष्ट्राच्या निर्णयाने २०२३ हे आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष राबवत असून महात्मा फुले जयंतीनिमित्त गोळेगणी पंचक्रोशी माध्यमिक हायस्कूल व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गोळेगणी येथे तालुका कृषी विभागामार्फत चित्रकला स्पर्धा आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गोळेगणी प्रकाश दळवी, उपसरपंच ज्ञानेश्वर मोरे, कृषी मित्र नामदेव येरुणकर, ग्रामरोजगार सेवक शेखर येरूणकर, प्रगतशील शेतकरी प्रकाश येरुणकर, युवा शेतकरी प्रसाद पवार, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुख्याध्यापक विलास उतेकर, पंचक्रोशी माध्यमिक हायस्कूलचे मुख्याध्यापक विलास जाधव उपस्थित होते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये तृणधान्याचे आहारामधील महत्व चित्रकलेद्वारे समजावे, आहारात बदल होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांचे मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य चित्रकला स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

चित्रकला स्पर्धा ही पहिला गट पहिली ते चौथी, दुसरा गट इयत्ता पाचवी ते आठवी, तिसरा गट इयत्ता नववी ते दहावी गटामध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ३०पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विजेत्या विद्यार्थ्यांना १ मे रोजी प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार असल्याचे सांगितले. चित्रकला स्पर्धा ग्रामस्तरावर यशस्वी होण्यासाठी कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे व तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील, उपशिक्षक सुरेश दर्गे, गुरूप्रसाद गेजगे, गोळेगणीचे शाळेचे शिक्षक शंकर बळीकोंडवार यांनी सहकार्य केले. प्रास्ताविक अनिल डासाळकर तर सूत्रसंचालन शिक्षक सचिन दरेकर यांनी केले.

# रोहेकर नागरिक कडक उष्म्याने हैराण; शीतपेयांना मागणी वाढली

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात एप्रिल महिन्यात उष्णता वाढण्यास सुरुवात झाली आहे. दिवसा घराबाहेर निघता येत नाही अशी स्थिती दुपारच्या सुमारास रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात झाली आहे.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सूर्यनारायण आग ओकत असल्याचे दिसून येत आहे. दिवसा उष्णतेने नागरिक पुरता हैराण होत आहे. सकाळी शाळेत गेलेले विद्यार्थी दुपारी शाळेतून घरी येताना दमछाक होताना दिसत आहे. दुपारी वाटसरू यासह दुचाकीधारक सावलीचा आधार घेताना दिसत आहेत. दिवसा उष्णतेने नागरिक हैरण होत असताना रात्री शांत झोप लागेल असे वाटत असताना रात्री



मात्र उकड्याने नागरिक हैराण होत आहेत. अंगातून घामाच्या धारा निघत आहेत. चुकून रात्री वीज खंडित झाली तर नागरिक पुरता बेचैन होताना दिसत आहे.

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात उष्णतेचा पारा चढला असताना नागरिक मात्र कलिंगड, ऊसाचा रस, लिंबू सरबत, आईस्क्रीम यासह अन्य शीतपेयांकडे वळले आहेत. त्यामुळे शीतपेयांची मागणी सध्या वाढलेली दिसून येत आहे. या उष्णतेचा सर्वाधिक त्रास लहान मुलांना आणि वयोवृद्धांना होताना दिसत आहे.

एप्रिल महिना सुरू झाल्यापासून पहिल्याच आठवड्यात सूर्यनारायणाने आग ओकण्यास सुरुवात केली आहे.

एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात ही स्थिती असताना मे महिन्यात मात्र नागरिकांचे मोठ्या प्रमाणात उष्णतेचा सामना करावा लागणार आहे.


**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**FIRST EXTENSION**

The Due Date for Submission of bids for following E-Tender has been extended, concern may please be noted. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

| RFx No. | Description | Estimated Cost | Extended Due Date for Submission Quotation |
|---|---|---|---|
| Ten-4/23-24 **7000026929** | Providing outsourced driver for departmental vehicle MH43-J 5251 at PAC Division Panvel for the period of one year. **Tender Fee:** Rs. 500/-+ GST **EMD:** Rs.5,000/- | Rs. 3,22,476.24 | 11.04.2023 @18:00 Hrs to 18.04.2023 @23:59 Hrs. |

**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006220 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**


# टाळ मृदुंगाच्या गजराने शिवशंभू महादेव मंदिर परिसर दुमदुमला

## ताळाघर हायस्कूल पटांगणातील किर्तन महोत्सवाला प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

कोकण श्री विठ्ठल परिवाराच्या माध्यमातून रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र स्वयंभू देवस्थान महादेव मंदिर येथील ताळाघर हायस्कूलच्या पटांगणात भव्य-दिव्य कीर्तन आयोजित करण्यात आले होते.

संपूर्ण पंचक्रोशी टाळ मृदुंगाच्या आवाजाने दुमदुमली होती असंख्य वारकऱ्यांच्या उपस्थितीत हा भव्य दिव्य किर्तन महोत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात झाला.

कोकण श्री विठ्ठल परिवाराच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला श्री विठ्ठलनामाची गोडी लागावी यासाठी भक्तीमार्गावर निष्ठापूर्वक वाटचाल करणाऱ्या हरिभक्ती पारायण मंडळींसाठी चालू केलेल्या या उपक्रमाला गेली तीन वर्षे चांगला प्रतिसाद मिळत आहे. सर्व वारकरी मंडळीना एक चांगले धर्मिक व्यासपीठ उपलब्ध होत आहे त्यामुळे रोहा तालुक्यासह धाटाव विभागामध्ये आंनदाचे वातावरण आहे.

प्रवचनकार रायगडभुषण हभप बाळाराम महाराज शेळके तर शब्दसाधक हभप अनिल महाराज महाकले यांनी कीर्तनामध्ये उपस्थितीत वारकऱ्यांना आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा माझिया सकळा हरीचिया दासा या अभंगावर अध्यात्मिक मार्गदर्शन केले.

गायनाचार्य भजनसम्राट हभप ओमकार महाराज जगताप, हभप हरिश्चंद्र महाराज, हभप रवी महाराज मरवडे, हभप विकास महाराज कोस्तकर, हभप नरेश महाराज दळवी, हभप वैभव महाराज खांडकर, ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व रायगड भुषण हभप नारायण महाराज दहिंबेकर, हभप सदानंद महाराज जुईकर यांनी केले.

या कीर्तन महोत्सवांतर्गत सकाळी काकड आरती, अभिषेक व पूजन, कलश पूजन ध्वजपूजन ज्ञानेश्वरी पूजन, दुपारी ज्ञानेश्वरी पारायण व गाथा भजन तसेच सायंकाळी प्रवचन व सार्वजनिक हरिपाठ व कीर्तन नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी विशेष मोहीम

**अलिबाग : प्रतिनिधी**

२०२३-२ या शैक्षणिक वर्षात व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी राज्य/राष्ट्रीय स्तरावरील सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे आरक्षित जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यापासून वंचित राहू नये यासाठी ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केला नाही, अशा विद्यार्थ्यांनी ज्या जिल्ह्यातून जात प्रमाणपत्र मिळविले आहे, त्या जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्वरीत अर्ज सादर करण्याबाबत १ एप्रिल ते १ मे या कालावधीत विशेष मोहीम राबविली जात आहे.

यानुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील इयत्ता ११ वी व १२वी विज्ञान आणि अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमास शिक्षण घेत असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात संपर्क साधून जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत. राज्यातील एकही मागासवर्गीय विद्यार्थी जात वैधता प्रमाणपत्राअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहू नये, असे शासनाचे उद्दिष्ट आहे.


**सिडको**
शहरांचे शिल्पकार

### लवाद, नगर रचना परीयोजना नैना क्र.४, नैना यांचे कार्यालय

**आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग), शिल्लोत्तर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)**

### जाहीर सूचना

क्रमांक: लवाद /नरयो-४/साधारण/२०२३/

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) च्या कलम ६८ (२) मधील तरतुदीनुसार सिडको नैना प्रारुप नगर रचना योजना क्र. ४ ही योजना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांचेकडील अधिसूचना क्रमांक सिडको/नैना/टीपीएस-४/प्रा.यो./२०२२/५६३ दिनांक २१ ऑक्टोबर २०२२ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त् अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-२ मध्ये दिनांक ४ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द् झालेली आहे.

उपनिरिर्दिष्ट् नगर रचना योजनेतील सर्व संबंधीतांना या सूचनेद्वारा जाहीर करण्यात येते की, कलम ७२ मधील तरतुदीप्रमाणे, नैना प्रारुप नगर रचना योजना क्र. ४. ला अंतिम स्वरुप देण्यासाठी निन्मस्वाक्षरीकार यांची लवाद म्हणून नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील कलम ७२(१) खालील अधिसूचना क्र.टीपीएस-१२२२/२१५२/प्र.क्र. १४८/२२/नवि -२२ दिनांक २ डिसेंबर २०२२ अन्वये नियुक्ती केली असून सदरहू अधिसूचना दिनांक २३-२९ मार्च २०२३ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र कोकण विभाग पुरवणी, पान क्र. १ यावर प्रसिध्द झालेली आहे.

तसेच सर्व हितसंबंधीतांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२ मधील तरतुदीनुसार आणि त्याअंतर्गत केलेल्या महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियम १३ नुसार, या सूचनेद्वारे जाहीर कळविण्यात येते की, आज दिनांक ०५/०४/२०२३ रोजी नियुक्त् लवाद यांनी वरील योजने संदर्भात लवादीय कामकाजास सुरवात केली आहे आणि या योजनेमुळे बाधित झालेल्या जमीन धारकांना प्रत्यक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडण्यासाठी यथावकाश लेखी सूचनेद्वारे त्यांचेकडून कळविण्यात येणार आहे. या योजने संदर्भात ज्यांना काही प्रस्ताव किंवा सूचना दयावयाच्या असतील त्यांनी त्या लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना ६० दिवसाच्या कालावधीत दाखल करावयाच्या आहेत.

वरील प्रमाणे योजना तयार केल्यामुळे, ज्या जमीन धारकांच्या कोणत्याही मिळकती बाधित (Injuriously Affected) होतील आणि त्यामुळे कलम १०२ प्रमाणे यासंदर्भात मोबदला देय असेल त्यांनी निन्मस्वाक्षरीकार यांचेकडे, सदरहू नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द् झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, त्यांची मागणी दाखल करणे आवश्यक राहील.

तसेच याद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील शासन मंजूर प्रारुप योजना अंतिम करण्यासंदर्भात, अधिनियमांच्या कलम ७२ मधील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करताना, या योजनेची प्रथमत: प्राथमिक न.र.यो आणि अंतिम न.र.यो याप्रमाणे उपविभागणी करुन तदनंतर पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येणार आहे.

**दिनांक :** ०५/०४/२०२३
**पत्ता :** नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
आठवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल,
सीबीडी बेलापूर- नवी मुंबई - ४००६१४

**(श्रीरंग लांडगे)**
**लवाद,**
नगर रचना परियोजना नैना क्र. ४
आदई (भाग), आकुर्ली (भाग), नेवाळी (भाग),
शिल्लोत्तर रायचूर (भाग) आणि पाली देवद (भाग)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०३१/२०२३-२४


# पेणजवळील विठ्ठलनगर येथे उद्यापासून गोरक्षनाथ उत्सव सोहळा

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील विठ्ठलनगर येथे श्री गोरोबा उत्सव मिती चैत्र कृ. शुक्रवार १४ ते १६ एप्रिल या कालावधीत होणार आहे.

१४ रोजी सकाळी ८ वा. अभिषेक, कलश पुजन, महाआरती, सकाळी १०.३० वा.भजन : बुवा - रोहिदास म्हात्रे (विठ्ठलनगर ), चंद्रकांत पाटील (घोडाबंदर), सुर्यकांत म्हात्रे (पैराणकरवाडी), मृदंगमणी ज्ञानेश्वर म्हात्रे (विठ्ठलनगर ), दुपारी १२ ते २ वा. श्री काळभैरव गोरक्षनाथ भजन मंडळ, ठाकूर बेडी, बुवा सूर्यकांत म्हात्रे, मृदंगमणी ज्ञानेश्वर म्हात्रे, सायं. ५ वा. भजन- जय भवानी भजन मंडळ मळेघरवाडी,बुवा - महेश म्हात्रे, अविनाश म्हात्रे, मृदंगमणी - संतोष म्हात्रे, विलास म्हात्रे. रात्री



९.३० वा. किर्तन: कीर्तनकार हभप प्राची मंदार व्यास, हार्मोनियम साथ रायगड भूषण, किशोर अनंत म्हात्रे (दिव), तबला जितेंद्र म्हात्रे (भाल),रात्री १२ वा.भजनांचा कार्यक्रम श्री साई गणेश भजन मंडळ मंत्रीवाडी, बुबा वेदिका विजय म्हात्रे, मृदुंगमणी रितेश विजय म्हात्रे (मंत्रीवाडी), शनिवार १५ एप्रिल रोजी सकाळी ८ वा.महाआरती, भजनांचा कार्यक्रम, सायं. ५.३० वा. हरिपाठ : काळभैरव कुलदैवत हरिपाठ मंडळ दिव, बुवा - हर्षदा अच्युत ठाकूर, कुणाल ठाकूर, ज्ञानेश्वरी ठाकूर, मृदुंगमणी - मारुती ठाकूर (दिव), रात्री ९.३० वा.कीर्तन कीर्तनकार हभप प्राची मंदार व्यास, हार्मोनियम साथ रायगड भूषण, किशोर अनंत म्हात्रे (दिव), तबला जितेंद्र म्हात्रे (भाल), रात्री १२ वा. भजनांचा कार्यक्रम होणार आहे.

# नवी मुंबईत विकासकामांना वेग

## दिघा व घणसोलीतील कामांची आयुक्तांकडून पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सुरू असलेली नागरी विकास कामे गुणवत्तापूर्ण असावीत हा नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांचा कटाक्ष असून यादृष्टीने आयुक्तांनी दिघा परिसरात सुरू असलेल्या विविध विकास कामांची पाहणी केली. या वेळी त्यांच्यासमवेत शहर अभियंता संजय देसाई, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील, कार्यकारी अभियंता मनोहर सोनावणे व प्रवीण गाडे, दिघा विभागाचे सहाय्यक आयुक्त शंकर खाडे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.



दिघा परिसरातील सांडपाण्याच्या सुयोग्य व्यवस्थापनासाठी मलनि:स्सारण वाहिन्या टाकल्या जात असून साधारणत: २० कि.मी. कामापैकी ८ कि.मी. काम झाले असून पुढील काम प्रगतीपथावर आहे. टिटिसी एमआयडीसीत जाणाऱ्या मुख्य रस्त्यावरील मलनि:स्सारण वाहिन्यांच्या कामांची आयुक्तांनी पाहणी करत या कामाला गती देण्याच्या सूचना अभियांत्रिकी विभागाला दिल्या.

दिघा विभागात इलठणपाडा येथे ब्रिटीशकालीन धरण असून साधारणत: १९१२ साली रेल्वेने हे धरण बांधले होते. या धरणाची साठवण क्षमता १३.५६ कोटी लिटर असून धरण क्षेत्र आणि धरणाचा परिसर अशी १८ एकर जागा आहे. महापालिका आयुक्त श्री. राजेश नार्वेकर यांनी सदर धरण परिसराला भेट देऊन धरणाची व परिसराची पाहणी केली.

नवी मुंबई महापालिकेने घणसोली येथे निसर्गाच्या पंचतत्वांवर आधारित सेंट्रल पार्क विकसित केले असून या पार्कमध्ये नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सुविधांची पाहणी करताना आयुक्तांनी येथील सुविधा सुस्थितीत रहाव्यात व नागरिकांना याचा पूर्ण उपयोग घेता यावा यादृष्टीने काही सुविधांमध्ये सुधारणा सुचविल्या.

सेंट्रल पार्कच्या सभोवताली सकाळी व संध्याकाळी नागरिक मोठ्या प्रमाणावर जॉगींगसाठी येत असतात. तेथील जॉगींग ट्रॅकही सुव्यवस्थित राखण्याची काळजी घेण्याच्या सूचना या वेळी आयुक्तांनी दिल्या.

### नागरिकांना दर्जेदार सुविधा देण्याचे निर्देश

***नवी मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत असलेली कामे गुणवत्तपूर्ण राखण्यासोबतच त्यांची देखभाल व दुरुस्तीही वेळच्या वेळी करून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्धतेच्या दृष्टीने लक्ष देण्याचे काटेकोर निर्देश महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी या दौऱ्यामध्ये दिले.***

# भाताण ग्रामपंचायतीतर्फे आधारकार्ड अद्ययावत शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

(छाया : राकेश खराडे)





**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आधारकार्ड धारकांसाठी डॉक्युमेंट अपडेट हे नवीन फिचर विकसित झाल्याने नागरिकांनी आधारकार्ड अद्ययावत करून घ्यावे, यासाठी भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी लक्ष्मण पाटील यांनी आपल्या निवासस्थानी तसेच ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांसाठी तीन दिवसीय आयोजित केलेल्या आधारकार्ड अद्ययावत शिबिराला या भागातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरात २९४ नागरिकांनी आपले आधारकार्ड अद्ययावत करून घेतले. सन २०१५ पासून देशामध्ये युनिक आयडेंटिफिकेशन ॲथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यामार्फत देशातील नागरिकांना आधारकार्ड देण्यात येत आहे. बायोमेट्रिक प्रमाणिकरणासह रहिवाशाची ओळख पटवण्यासाठी आधारकार्ड हा ओळखीचा सर्वात व्यापकपणे स्वीकारला जाणारा पुरावा आहे. नागरिकांकडून अनेक शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी आता आधारकार्डचा वापर केला जात आहे. यापुढे शासकीय व इतर सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपले आधारकार्ड अद्ययावत करून घेणे आवश्यक आहे. याकरिता भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी लक्ष्मण पाटील यांनी नागरिकांसाठी आधारकार्ड अद्ययावत शिबिराचे तीन दिवस आयोजन केले होते.

यासोबतच मुलगी सृष्टी हिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने सर्व प्रकारची मोफत आरोग्य तपासणी, पीएम किसान योजना, सुकन्या योजनासह आधारकार्डला पॅनकार्ड ३२ नागरिकांनी लिंक केले तर ३५ महिलांनी फुल बनविण्याचे मोफत प्रशिक्षण घेतले.

या वेळी तीन दिवस शिबिर यशस्वी करण्यासाठी माजी नगरसेवक बबन मुकादम, सूभाष मुकादम, किरण मुकादम, स्वप्नील भोईर, बलीराम मुकादम, चंद्रकांत मुकादम, दीपक दुर्गे, कृष्णा जूमारे, मारुती सते, विजय ठाकूर, नितेश भोईर, अनिल भोईर, अनंता सते, अरूण म्हस्कर, शांताराम पाटील, महेश घरत, कृष्णा भोईर आदीसह कृषी अधिकारी स्टाप, यूवा संस्थेचे सर्वेसर्वा चेतन वाघ, आधारकार्डची तीन दिवस सेवा देणारे मंदार मानकावले आदींनी अथक परिश्रम घेतले.

(छाया : बालाजी राव)



**पनवेल : भारत विकास परिषदेच्या वतीने भानघर येथील करुणेश्वर वृद्धाश्रमात आयोजित हळदीकुंकू समारंभात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर उपस्थित होत्या. या वेळी संस्थेने दत्तक घेतलेल्या बोंडारपाडा या आदिवासी पाड्यातील महिलांनी तयार केलेले स्वादिष्ट व पौष्टिक लोणचे भेट देण्यात आले.**

## गार्डनमध्ये आढळला एकाचा मृतदेह

**पनवेल :** तळोजा फेज १ सेक्टर १४ येथील गार्डनमध्ये एक अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध तळोजा पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे असून त्याचा रंग सावळा, चेहरा उभट, उंची पाच फूट चार इंच, नाक सरळ, पांढरी दाढी आहे. या व्यक्तीबाबत अधिक माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे (०२२-२७४१२३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक महादेव बडे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खारघरच्या सत्याग्रह महाविद्यालयात उद्या परिसंवाद

**खारघर, नवी मुंबई : प्रतिनिधी**

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंती महोत्सवाचे आयोजन १४ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आले आहे. या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नवीन शिक्षण धोरण यावर परिसंवाद या अभिनव उपक्रमाचेदेखील आयोजन करण्यात आले आहे.

या परिसंवादात टाटा समाज विज्ञान संस्थेचे राजेश इंगळे, मोहन गायकवाड, डॉ. शुभांसू भालाधरे, प्राचार्य डॉ. अशोक आढाव आदी प्रमुख पाहूणे सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जी. के. डोंगरगावकर असणार आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. तसेच जयंती महोत्सवाच्या निमित्ताने पाली-संस्कृत विभाग, सत्याग्रह कॉलेजच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे, पाली आणि संस्कृत भाषेतील त्रिपीठक, रामायण, महाभारत, वेद, पुराण, बायबल, कुराण आणि भारताचे संविधानासह दुर्मीळ साहित्याचे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे.

मुंबई प्रदेशातील नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सत्याग्रह अध्यापक महाविदयालयाच्या प्राचार्या नेहा राणे यांनी केले आहे. नवी मुंबई क्षेत्रातील आदर्श मातापित्याचा सन्मान चिन्ह देवून गौरव करण्यात येणार आहे. डॉ जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल, सिध्दार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, पाली-संस्कृत भाषा प्रशिक्षण केंद्र, डॉ बाबासाहेब आंबेडकर सशोधन संस्थेतील सर्व विदयार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी होणार असून ११ एप्रिल ते १ मे कालावधीत शासनाच्या समता पर्व अभियानांतर्गत अनेक उपक्रम ठेवले आहेत, असे प्राचार्या वनिता सुर्यवंशी, अमरचंद हाडोळतीकर, एम. एल. सुर्यवंशी, प्रमिला सणस, कवलजीत तलवार, नेहा कपोते, आशा शिंदे यांनी कळविले आहे.

# मोहोपाड्यात रास्त भाव धान्य दुकानातून आनंदाचा शिधाचे वाटप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यभरातील शिधापत्रिका धारकांना फक्त १०० रुपयांत 'आनंदाचा शिधा' देण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. त्यानुसार बुधवार दिनांक १२ रोजी सकाळी वासांबे मोहोपाडा शहरातील मरिआई मंदिराजवळ असणाऱ्या रास्त भाव धान्य दुकानातून नागरिकांना आनंदाचा शिधा देण्यास सुरुवात झाली आहे. मोहोपाड्यातील स्थानिकांच्या हस्ते शुभारंभ करुन रास्त भाव धान्य दुकानाचे अनंता पाटील यांच्या हस्ते नागरिकांना आनंदाचा शिधाचे वाटप करण्यात आले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील एक कोटी ६३ लाख शिधापत्रिकाधारकांना केवळ १०० रुपयात एक किलो रवा, एक किलो चणा डाळ, एक किलो साखर तसेच एक लीटर पामतेल असा आनंदाचा शिधा देण्याची घोषणा केली होती. त्यानुसार तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या आदेशानुसार वासांबे मोहोपाडा रास्त भाव धान्य दुकान नंबर १ याचे अनंता पाटील यांनी आनंदाचा शिधा वाटपाला सुरुवात केली आहे. आनंदाचा शिधा घेण्यासाठी लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळवली आणि वाशिवलीमध्ये विविध कामांचा शुभारंभ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बिर्ला कार्बन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पातळगंगा यांच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वडगाव हद्दीतील तळवली व वाशिवली गावामध्ये कंपनीमार्फत युवकांसाठी दोन जिमच्या इमारतींचे बांधकाम करण्यात आले आहे. तसेच तळवली गावाकरिता शुद्ध पिण्याच्या पाण्याकरीता आरो. वॉटर युनिट कंपनीमार्फत बसविण्यात आले आहे.




युनिटमार्फत प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक दिवशी वीस लिटर शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. दोन्ही योजनांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा बिर्ला कार्बन एशियाचे सीएमओ संजीव सुद यांच्या प्रमुख उपस्थितीत वाशिवली व तळवली गावामध्ये झाला. कार्यक्रमास ग्रुप ग्रामपंचायत वडगावच्या सरपंच गौरीताई गडगे तसेच महादेव गडगे, संदेश मालकर व सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच बिर्ला कार्बन पातळगंगा युनिटचे युनिट हेड गुप्ता, एच. आर. हेड प्रकाश देसाई, इंजिनिअरिंग हेड पूर्णुंदू कुमार प्रोडक्शन हेड विजय अगरवाल उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाशिवली व तळवली गावातील सर्व ग्रामस्थ व महिला वर्गाचे विशेष योगदान लाभले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक मालकर यांनी केले.

कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन कंपनीचे सामाजिक विकास अधिकारी लक्ष्मण मोरे यांनी केले.

# न आवडत्या अभ्यासासाठीही वेळ द्यावा- डॉ. माटे



**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील एसएससी आणि एचएससी विद्यार्थ्यांना सकाळ व दुपार सत्रात अभ्यासविषयक मार्गदर्शन करताना न आवडत्या विषयासाठी निश्चित वेळ दिला जावा असा मोलाचा सल्ला मानसोपचारतज्ज्ञ डॉ. ओंकार माटे यांनी दिला.

ध्येय गाठण्यासाठी अभ्यासाची आवश्यकता, सोशल मीडियाचे फायदे तोटे, त्याचा आपल्या मानसिकतेवर होणारा परिणाम, उपलब्ध वेळेचे योग्य व्यवस्थापन, युट्यूबचे फायदे तोटे या विषयी डॉ. माटे यांनी विद्यार्थ्यांशी मुक्तपणे संवाद साधला.

मानसशास्त्र अभ्यासक केदार कुलकर्णी व अशोक जाधव यांनी विविध उदाहरणांचा वापर करून ध्येयनिश्चिती, प्रयत्नांचे सातत्य, जिद्द, चिकाटी, कृतज्ञता, वाकून नमस्कार करण्याचे फायदे, अभ्यासाला बसण्याच्या चांगल्या सवयी, जागा, वेळा आणि दिशा तसेच मेंदूचे विषयानुसार कार्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक भीमराव अडसूळ, श्रीजा नायर, सुवर्णा मिसाळ, राजकुमारी इंदलकर, समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका शोभा लवटे तसेच सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# कृतज्ञता पुरस्कारसाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या यशवंतराव चव्हाण सेंटर नवी मुंबई केंद्रातर्फे विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या संस्था अथवा व्यक्तीस कृतज्ञता पुरस्कार २०२३ जाहीर करायचा असून यासाठी केवळ नवी मुंबई कार्यक्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या इच्छुक व्यक्ती वा संस्था यांनी स्वतः अथवा अन्य व्यक्तीच्या शिफारसीने आपली कार्याची तपशीलवार माहिती असलेली प्रवेशिका ३० एप्रिल २०२३ पूर्वी pramodkarnad@gmail.com किंवा सचिव डॉ. अशोक पाटील (९३२२९६७५०८) यांना संपर्क साधून प्रत्यक्ष द्यावी, असे आवाहन सेंटरचे अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी केले आहे.

याविषयी अधिक माहिती देताना अध्यक्ष प्रमोद कर्नाड यांनी अशी माहिती दिली आहे की नवी मुंबई कार्यक्षेत्रामध्ये शास्त्र, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, महिला संघटना, साहित्य, कला, क्रीडा, देशसेवा, आरोग्य, समाजसेवा, प्रशासन, पर्यावरण, चित्रकला सांस्कृतिक, गायन, अभिनय, चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन अशा कोणत्याही क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या संस्था वा व्यक्ती कृतज्ञता पुरस्कारास पात्र ठरतील. तसेच यापूर्वी प्रतिष्ठानचा पुरस्कार प्राप्त व्यक्ती वा संस्था यांना पुन्हा प्रवेशिका भरता येणार नाही. कृतज्ञता पुरस्कार यशवंतराव चव्हाण सेंटरच्या खास कार्यक्रमात, समारंभ पूर्वक माहे मे २०२३ मध्ये प्रदान केला जाईल. तरी या संधीचा संबंधितांनी त्वरित अर्ज करून लाभ घ्यावा.

# ज्येष्ठ विचारवंत प्रा. हरी नरके यांचे आज व्याख्यान

पनवेल : वार्ताहर

गोल्ड मेडलिस्ट, पुणे विद्यापीठात महात्मा फुले अध्यासनाचे अध्यासन प्राध्यापक, महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भांडारकर प्राच्य विद्यासंस्थेचे उपाध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य म्हणून बाबासाहेबांचे दुर्मीळ असे अनेक ग्रंथ प्रकाशित करण्यात महत्त्वाचे योगदान असलेले अभ्यासू विचारवंत, संशोधक, अनेक पुस्तकांचे लेखक, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कीर्तीचे वक्ते हरी नरके यांचे व्याख्यान पनवेलकरांना अनुभण्यास मिळणार आहे.



आंबेडकर जयंती साजरी करीत असताना केवळ आनंदोत्सव साजरा न करता बाबासाहेबांचे विचार ऐकण्याची संधी नागरिकांना मिळावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीने व्याख्यानाची पर्वणी उपलब्ध करून दिली आहे. हरी नरके यांच्या व्याख्यानासाठी जास्तीत जास्त संख्येने लोक उपस्थित राहवे म्हणून कामगार नेते महादेव वाघमारे यांनी आवाहन केले आहे.

१४ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता कुटुंबासहित विचारवंताचे विचार ग्रहण करण्यासाठी व्याख्यानाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

याशिवाय सायंकाळी ६ वाजता तक्षशिला बुद्धविहार येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात येणार १३ एप्रिल रोजी महिलांसाठी विविध स्पर्धांचे तसेच मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे. खांदा कॉलनीत विविध संघटना, संस्था एकत्र येऊन जयंती महोत्सव समिती स्थापन केली आहे.

मागील वर्षी खांदा कॉलनीमधील भीम अनुयायांनी एकत्र येऊन आंबेडकरी अनुयायांनी एकीची ताकद खांदा कॉलनीला नव्हे संपूर्ण पनवेलला दाखवून दिली. यंदा गतवर्षी पेक्षा जास्त नागरिकांनी एकत्र येवून भव्यदिव्य जयंती साजरी करू असे आवाहन करण्यात आले आहे.

# ऐतिहासिक वास्तू नष्ट होण्याच्या मार्गावर

## रेवदंडा आगरकोट किल्ल्याची स्थिती; संबंधित विभागाचे दुर्लक्ष

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्थानिकांच्या जमीनी खरेदी करून काही स्थानिक मंडळी व धनदांडगे रेवदंडा आगरकोट किल्ल्यात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण क्षेत्रात प्रतिबंध व निर्बंधीत क्षेत्राचे उल्लघंन करून नियमबाह्य नवीन बांधकामे ऐतिहासिक अवशेष व वास्तूची तोडफोड करीत करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केंद्रीय पुरातत्व विभागास अनेकांनी अनेकदा केलेल्या तक्रार अर्जात केला आहे. मात्र या तक्रार अर्जास केराची टोपली केंद्रीय पुरातत्व विभागाकडून दाखविली जात असल्याने संप्तत प्रतिक्रिया ग्रामस्थ व इतिहासप्रेमी मंडळी व्यक्त करत आहेत.



भारतीय पुरातन सर्वेक्षणच्या नियम ३२ अन्वये प्राचीन स्मारके, पुरातत्वीय स्थळे, आणि अवशेष अधिनियम १९५९ अन्वये संरक्षीत स्मारकांच्या सीमेपासून १०० मीटरपर्यंत व त्यापलिकडे २०० मीटर पर्यंतच्या जागा खणणे व बांधकाम करणे यासाठी प्रतिबंध व निर्बंधीत क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आले असून तसे फलक रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात ठिकठिकाणी केंद्रीय पुरातत्व विभागाचे वतीने लावण्यात आले आहे. मात्र तरीहीप्रतिबंध व निर्बंधीत क्षेत्राचे उल्लघंन करून नियमबाह्य बांधकामे काही स्थानिक व धनदांडगे येथील स्थानिकांच्या जमिनीची खरेदी करून करत आहेत. त्यासंदर्भात ग्रामस्थांचे वतीने केंद्रीय पुरातत्व विभागास केलेल्या तक्रारीस चक्क केराची टोपली दाखविली जात असून बांधकामे बिनधोकपणे पूर्ण केली आहेत. काही बांधकामे सुरू असल्याचे अर्जात म्हटले आहे. ग्रामस्थांनी केंद्रीय पुरातत्व विभागास केलेल्या तक्रारीत बांधकामे करताना प्रतिबंध व निर्बंधीत क्षेत्राचे उल्लघंन करून ऐतिहासिक अवशेष व वास्तूची तोडफोड केली जात असल्याचा आरोप वारंवार केल्या गेलेल्या तक्रार अर्जात केला आहे. केंद्रीय पुरातत्व विभाग अनेक ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीस गांभिर्याने घेत नसून ऐतिहासिक अवशेष व वास्तू नामशेष केले जात असल्याने संतापजनक प्रतिक्रिया स्थानिक ग्रामस्थ व इतिहासप्रेमी मंडळी व्यक्त करीत आहेत.

रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरातील बांधकामे केंद्रीय पुरातत्व विभागाच्या आदेश फलकानुसार नियमबाह्य होत असल्याचे निर्दशनास येते, मात्र केंद्रीय पुरातत्व विभाग अनेक ग्रामस्थांनी केलेल्या तक्रार अर्जाची दखल का घेतली जात नाही? हा प्रश्न उपस्थित केला जात असून ही बांधकामे थांबविण्याऐवजी बिनधोकपणे पूर्ण केली गेली जात आहेत, त्यानुसार या बांधकामाच्या माध्यमातून संबधीत मोठी आर्थिक लुट करत असल्याचा आरोप केला जात आहे. या बांधकामासाठी लाखो रूपयांचा मलिदा व मोठी भरलेली पाकिटे सरकवली जात असल्याचा संशय ग्रामस्थ व्यक्त करत आहेत. नित्याने ऐतिहासिक किल्ल्याचे संरक्षण व स्वच्छता आदी उपक्रम राबवित प्रसिध्दी घेत असलेल्या इतिहास प्रेमी मंडळी व संघटना सुध्दा या बांधकामाकडे का दुर्लक्ष करत आहेत असाही प्रश्न उपस्थित केला जातोय.

रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात अनेक बांधकामे केली गेली व अनेक बांधकामे सुरू आहेत, या संदर्भात ग्रामस्थ तक्रार अर्ज केंद्रीय पुरातत्व खात्याकडे नित्याने अनेकांनी केली आहेत. मात्र केंद्रीय पुरातत्व विभाग कोणतीच कारवाई करत नसल्याचे दिसून येत आहे. अनेकांना नोटीसी पाठविण्यात आल्याचे येथील महसुल विभागाकडून सांगितले जाते परंतु नोटीसी व्यक्तीरिक्त ठोस कारवाई करण्यात येत नसल्याचे बांधकामे निर्धास्तपणे पूर्ण केली जात आहेत असेच चित्र दिसते.

### इतिहासप्रेमी मंडळींची नाराजी

केंद्रीय पुरातत्व विभाग व संबधीत यांनी केलेल्या दुर्लक्षतेने रेवदंडा आगरकोट किल्ला परिसरात नवीनवीन बांधकामे संबधीताच्या आशिर्वादाने सुरू आहेत व पुढे होतील. या बांधकामाने आगरकोट किल्ला परिसरातील ऐतिहासिक अवशेष व वास्तू निश्चित नष्ट होण्याचे मार्गावर आहेत. एकीकडे शासन व पुरातत्व विभाग प्राचीन व ऐतिहासिक वास्तू व अवशेष यांचे जतन करण्यासाठी विविध उपाययोजना करत आहे मात्र ग्रामस्थ व इतिहासप्रेमी मंडळीच्या तक्रार अर्जास केराची टोपली दाखविली जात असून या तक्रार अर्जाच्या दुर्लक्षतेने या पुढे ऐतिहासिक वास्तू व अवशेष नाहीसे होण्याच्या मार्गावर आहेत.

## निवडक

### महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन



**अलिबाग :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्ताने आज जिल्हाधिकारी कार्यालयात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला तहसीलदार डॉ. सतिश कदम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी सहाय्यक पुरवठा अधिकारी गोविंद वाकडे यांच्यासहित जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### वृत्तपत्र रद्दी विक्रीसाठी मुदतवाढ

**अलिबाग :** जिल्हा माहिती कार्यालय, रायगड–अलिबाग या कार्यालयातील जुन्या वृत्तपत्रांची रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाप्यात २० मार्चपर्यंत जिल्हा माहिती कार्यालय, रायगड–अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशेजारी, अलिबाग येथे सादर करावीत असे १५ मार्च रोजी वृत्त प्रकाशित करुन कळविण्यात आले होते, परंतु यासाठी जिल्हा माहिती कार्यालय, रायगड–अलिबाग कार्यालयाकडून स्थानिक रद्दी विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाप्यात सादर करण्यास १७ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी सांगितले.

### दरपत्रके सादर करण्याचे आवाहन

**अलिबाग :** जिल्हा माहिती कार्यालय, रायगड–अलिबाग या कार्यालयातील लोखंडी कपाटे–५, व्हिलचेअर–१, मॉनिटर २ नग, प्रिंटर ३ नग, सीपीयू ३ नग, कीबोर्ड ४ नग, टेबल फॅन १ नग यांची विक्री करावयाची आहे. त्यासाठी स्थानिक विक्रेत्यांनी आपली दरपत्रके बंद लिफाप्यात १७ एप्रिल २०२३ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालय, रायगड–अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अपर जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाशेजारी,अलिबाग येथे सादर करावीत, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाने केले आहे.

### राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांचा रायगड जिल्हा दौरा



**अलिबाग :** राज्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज शिवाजीराव देसाई हे १४ ते १६ एप्रिल रोजी रायगड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : शुक्रवार, १४ एप्रिल रोजी सकाळी १०.४५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथून खाजगी वाहनाने खारघर, नवी मुंबईकडे प्रयाण. दुपारी १.३० वाजता खारघर, नवी मुंबई येथे आगमन व महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण कार्यक्रम पूर्वतयारीची पाहणी व आढावा. सोईनुसार खारघर, नवी मुंबई येथून मुंबईकडे प्रयाण. शनिवार, १५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता पावणगड (बी–४), शासकीय निवासस्थान येथून खारघर, नवी मुंबईकडे प्रयाण. सायंकाळी ५ वाजता खारघर, नवी मुंबई येथे आगमन व महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण कार्यक्रम पूर्वतयारीची पाहणी. राखीव व मुक्काम.रविवार, १६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता खारघर,नवी मुंबई येथील महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. तर सोईनुसार खारघर,नवी मुंबई येथून मुंबईकडे ते प्रयाण करणार आहेत.

### मंथन पब्लिकेशन राज्यस्तरीय परीक्षेत प्रबोध शिर्के रायगड जिल्ह्यात प्रथम



माणगाव : माणगाव येथील शिक्षक व प्राथमिक शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील गट) माणगावचे तालुकाध्यक्ष दत्ता शिर्के यांचा सुपुत्र व ना.म.जोशी विद्याभवन गोरेगावचा इयत्ता आठवीतील विद्यार्थी कु. प्रबोध शिर्के याने मंथन पब्लिकेशन राज्यस्तरीय परीक्षेत रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याने मिळविलेल्या या उज्वल यशाबद्दल त्याचे सर्वत्र विशेष कौतुक व अभिनंदन होत असून माणगाव प्राथमिक शिक्षक संघाने त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. फेब्रुवारी २०२२ मध्ये माणगाव तालुक्यातील ना.म.जोशी विद्याभवन गोरेगाव केंद्रात मंथन पब्लिकेशन राज्यस्तरीय परीक्षा झाली होती. परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत लहानपणापासूनच बुद्धीने तल्लक असलेला व सर्वच क्षेत्रात गुणसंपन्न असणारा विद्यार्थी प्रबोध शिर्के याने चांगला अभ्यास करून रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मन पटकावला त्याच्या या उज्वल यशाने त्याने आपल्या आई– वडिलांबरोबरच, शिक्षक वर्ग तसेच रायगड जिल्ह्यासह माणगाव तालुक्याचे नाव उंचावले आहे.

# पेण येथे जनजागृती शिबिराला प्रतिसाद



**पेण : प्रतिनिधी**

जातीभेदचा अंत, महिलांवरील अत्याचार व अस्पृश्यता याबद्दल महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८५० ते १८९० या कालावधीत सुरू केलेले कार्य आजही तितकेच महत्त्वाचे आहे अशा थोर पुरुषांच्या केवळ औपचारिक जयंती साजरा न करता खऱ्या अर्थाने थोर पुरुषांच्या विचाराचा प्रचार व प्रसार करण्याचे काम अंकुर ट्रस्ट या सामाजिक संस्थेने केले आहे .

महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून अंकुर ट्रस्ट या स्वयंसेवी संस्थेमार्फत एक आगळा वेगळ्या जनजागृती कार्यक्रम व नेतृत्वगुण विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये मानसोपचार तज्ञ डॉ. रुपेश पाटकर, प्रेरणा संस्थेचे भानुदास धुरी, लंकेश गवस आदींनी साधन व्यक्ती म्हणून काम केले. या निवासी शिबिरात आदिवासी मुलांना करिअर बद्दलच्या विविध संधी याबाबत जगदीश भगत यांनी मार्गदर्शन केले. विविध सत्रांमध्ये युवकांनी अंधश्रद्धा, व्यसनमुक्ती, स्त्री हिंसा व शोषण या विषयावर पथनाट्य बसविली. हे चार पथनाट्य पेण तालुक्यातील बळवली ग्रामपंचायत येथील आदिवासी वाडीवर सादर करण्यात आली.

यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ता डॉ. वैशाली पाटील यांनी आदिवासी बंधू भगिनींसोबत संवाद साधला सामाजिक कार्याचे प्रशिक्षण घेतलेल्या व अंकुर संस्थेसोबत शिक्षणावर कार्य करणाऱ्या प्रतीक्षा पोपकर व तृप्ती धुरी यांनी महात्मा फुले जयंतीनिमित्त युवकांना जागृतीचे गीते शिकवली व कार्यक्रमाचे आयोजन केले.

यावेळी झालेल्या समारोपच्या कार्यक्रमात श्री राज पाटील, डॉ. लता परांजपे, स्वातीचंद्र चक्रदेव व लंकेश गवस आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी स्नेहल पवार यांनी केले तर आभार प्रदर्शन पूर्वा वाघमारे या विद्यार्थिनीने केले.

# महात्मा जोतिबा फुले यांची जयंती पाली येथे साजरी

**पाली : प्रतिनिधी**

पालीतील कोकण कृषी विकास केंद्र येथे महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी ज्योतिबा फुलेंच्या फोटोचे अनावरण करण्यात आले. सत्यशोधक वारकरी महासंघाचे जिल्हाध्यक्ष महेश पोंगडे महाराज यांनी फुलेंचा जीवनपट उलगडला व त्यांच्या कार्याची उपस्थितांना माहिती दिली.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी सुनील दळवी यांच्या प्रयत्नाने हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी महात्मा फुले यांची तस्वीर कोकण कृषी विकास केंद्राला भेट दिली. यावेळी कोकण कृषी विकास केंद्र चालक राजेन्द्र माळी, महेंद्र राजेंद्र माळी, अष्टविनायक मिनिडोर चालक मालक संघटनेचे अध्यक्ष संजय ठकोरे, सत्यशोधक वारकरी महासंघाचे जिल्हाध्यक्ष ह भ प महेश पोंगडे महाराज, व्यवस्थापक गणेश शिंदे, डॉ. दत्तात्रेय राऊत, अविनाश गायकवाड, सुधाकर पवार, प्रकाश कामते, प्रकाश कदम, विकास चोरघे व निलेश कदम आदी मान्यवर उपस्थित होते.



# चित्रकार चेतन पाशिलकरचा पाली नगरपंचायतीकडून यथोचित सन्मान



**पाली : प्रतिनिधी**

फ्रान्समध्ये झालेल्या १० व्या इंटरनॅशनल एबीलिंपिक्स स्पर्धेत भारताला सुवर्णपदक पटकावून दिलेल्या दिव्यांग चित्रकार चेतन पाशीलकर यांचा पाली नगरपंचायतीने शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

यावेळी नगराध्यक्षा व सर्व नगरसेवक, नगरसेविका, नगरपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चेतनवर फुलांचा वर्षाव केला. सर्वांनी चेतन यांचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी पाली नगरपंचायत नगराध्यक्षा प्रणाली शेळके, मुख्याधिकारी विद्या येरूनकर, नगरसेविका कल्याणी दपके, जुईली ठोंबरे, मधुरा वरंडे, नगरसेवक सुधीर भालेराव, सचिन जवके, सुलतान बेनसेकर, व सुमेध खैरे यांच्यासमवेत चंद्रकांत पाशिलकर, श्रियोग पाशिलकर आदींसह पाली नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

# कशेळे येथे स्किलटेक टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची स्थापना





**कर्जत : प्रतिनिधी**

कशेळे येथे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून संसार सामाजिक संस्थेच्या माध्यमातून स्किलटेक टेक्निकल ट्रेनिंग इन्स्टिट्यूटची स्थापना करण्यात आली. १० वी १२ वी पास नापास तरुण शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

स्किलटेक टेक्निकल इन्स्टीट्यूटच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी संसार सामाजिक संस्थेचे संस्थापक संजू रणदिवे, अध्यक्षा सारिका रणदिवे, उपाध्यक्षा रिया गायकवाड, संस्थेचे सचिव व इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर विजय रणदिवे, खजिनदार विशाल उबाळे उपस्थित होते. आजपर्यंत संसार सामाजिक संस्था व जन शिक्षण संस्थान अलिबाग यांच्या विद्यमाने १२० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देवून स्वावलंबी केले आहे. संगणक प्रशिक्षक म्हणून स्वप्नाली रणदिवे, नितेश सावंत, कम्प्युटर हार्डवेअर प्रशिक्षक म्हणून योगेश राणे प्रशिक्षण देणार आहेत.

याप्रसंगी जन शिक्षण संस्थान अलिबाग रायगड कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, हरिश राणे, ऋषिकेश राणे, अक्षय तिटकरे, रोहन सावंत, ऋषिकेश सावंत, शुभम मराठे, वृक्षाली थोरवे, राहुल गायकवाड, तुकाराम वाघमारे, मुकुंद गायकवाड , गौरव भोईर, नितीन जाधव, नितीन मोहिते आदी उपस्थित होते.

# रेवदंड्यातील भाजी विक्रेत्यांनी घेतला छत्रींचा आधार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात कडक उन्ह डोईवर आले असताना, पारनाका येथील भाजी विक्रेत्यांना सावलीसाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागत आहे.



रेवदंड्यात भाजी मार्केटचा प्रश्न ऐरणीवर असून संबधीत भाजी मार्केटचा प्रश्न सोडविण्यास चक्क अपयशी ठरले आहेत. गेले अनेक वर्ष भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यात सावलीसाठी तर पावसाळ्यात पावसापासून बचाव करण्यासाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागत आहे. सध्यस्थितीत ऐन उन्हाळ्यात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी भाजी विक्रेते छत्री उघडून भाजी विक्री व्यवसाय करीत आहेत.

रेवदंडा शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या पंचक्रोशीतील भाजी विक्रेते व्यवसायासाठी ताजी भाजी उपलब्ध करीत असतात. ताजी भाजीसह कडधान्ये, चिंच, आंबे, सफेद कांदे, कलिगंडे आजूबाजूच्या बागायतीमधील विविध फळे पारनाका येथील भाजी विक्रेत्यांकडे उपलब्ध असते. सकाळचे कोवळे उन्ह सरताच उन्हाळ्यातील कडक सुर्य किरणे डोक्यावर पडताच सहन होत नाही, अशा परिस्थितीत भाजी, फळे, कडधान्य आदीचा व्यवसाय साधणे फार जिकीरीचे कठीण बनते. पंचक्रोशीतून भाजी मार्केट मध्ये खरेदी ग्राहक येत असतात त्यांना सुध्दा ऐन उन्हात खरेदी करावी लागते. भाजी मार्केटचा प्रश्न अनेक वर्ष रेंगाळत राहीला असून संबधीत गांभिर्याने पाहत नाहीत.

रेवदंडा शहरात अनेक वर्ष भाजी मार्केट सुविधा नाही, त्यामुळे भाजी विक्रेत्यासह खरेदीदारांना उन्हाळ्यात व पावसाळ्यात त्रास सहन करावा लागतो. मच्छी मार्केटचा सुध्दा प्रश्न नित्यांने निर्माण करतो आहे. रेवदंडा हायस्कूलच्या बाजूच्या गल्लीत रस्त्यावर तसेच गल्लीत मच्छी विक्री व्यवसाय केला जात आहे. या ठिकाणी बाहेरील वाहनांची कोंडी होते तर रेवदंडा समुद्र किनारी ये–जा करताना पर्यटकांना सुध्दा अडथळा निर्माण होतो. रेवदंड्यातील भाजी मार्केट व मच्छी मार्केट हे जिव्हाळ्याचे प्रश्न केव्हा सुटणार असा प्रश्न पंचक्रोशीतील ग्रामस्थ करत आहेत.



**खोपोली: महात्मा फुले जयंतीनिमित्त मंगळवारी खोपोली नगरपरिषद मुख्य कार्यालयात फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अनुप दुरे, माजी नगरसेवक मोहन अवसरमल, प्रशासन विभागातील विश्वास पाटील, कर विभागातील गजानन जाधव व इतर कर्मचारी उपस्थित होते.** (छाया :विनायक मांडपे)

# मुंबई इंडियन्सचा दिल्लीवर रोमांचक विजय

## रोहित शर्माच्या सर्वाधिक ६५ धावा



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२३च्या १६व्या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स हे संघ आमनेसामने आले होते. मुंबई इंडियन्सने दिल्लीला त्यांच्यात घरात सहा गडी राखून पराभूत करीत रोमांचक विजय मिळवला. प्रथम फलंदाजीची संधी मिळाल्यानंतर दिल्लीने सर्वबाद १७२ धावा केल्या. जेसन बेहरेनडॉर्फच्या षटकात मुंबईने चार बळी टिपत सामन्यात आपली बाजू भक्कम केली. मुंबईकडून कर्णधार रोहित शर्माने सर्वाधिक ६५ धावा केल्या. त्याला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

धावांचा पाठलाग करताना मुंबईने आक्रमक सुरुवात केली. पॉवर प्लेमध्ये मुंबईने दमदार सुरुवात केली असून कर्णधार रोहित आणि सलामीवीर इशान यांच्यात अवघ्या २६ चेंडूत ५० धावांची भागीदारी केली होती. दोघांनी मिळून पहिल्या १० षटकांत ७१ धावा केल्या. चुकीचा कॉल करीत रोहित शर्माने इशान किशनला धावबाद केले.

विजयाच्या उंबरठ्यावर असताना मुंबईला दुसरा धक्का बसला. तिलक वर्मा मोठा फटका मारण्याच्या नादात तो २९ चेंडूत ४१ धावा करीत मनीष पांडेकरवी झेलबाद झाला. त्यापाठोपाठ फॉर्ममध्ये नसलेला सूर्यकुमार यादव पहिल्याच चेंडूवर मोठा फटका मारत भोपळाही न फोडता बाद झाला. दोघांना एकाच षटकात मुकेश शर्माने बाद केले. दोन षटकांत दिल्लीने भेदक गोलंदाजी करीत मुंबईला तीन धक्के दिले. रोहितने ४५ चेंडूत ६५ धावा केल्या. शेवटच्या षटकात इम्पॅक्ट प्लेअर टीम डेव्हिडने मॅच जिंकून दिली.

तत्पूर्वी, डेव्हिड वॉर्नरने पुन्हा एकदा ५१ धावांची खेळी केली आणि त्याला उपकर्णधार अक्षर पटेलची चांगली साथ मिळाली. दोघांनी सहाव्या विकेटसाठी ३५ चेंडूत ६७ धावांची भागीदारी केली. मुंबई इंडियन्सचा फिरकीपटू पीयुष चावलाने सुरुवातीला दिल्लीला तीन धक्के दिले होते, परंतु मधल्या षटकांत दिल्लीने अप्रतिम फलंदाजी करीत सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. अक्षरने २५ चेंडूत ५४ धावा केल्या, त्यात त्याने चार चौकार आणि पाच षटकार मारले.

जेसन बेहरेनडॉर्फने १९व्या षटकात मुंबईला चार विकेट्स मिळवून देताना लक्ष्य थोडे मुंबईच्या आवाक्यात आणले. १८व्या षटकात पाच बाद १६५ धावा असणारा दिल्लीचा संघ पुढील १० चेंडूत सात धावा करून माघारी परतला. मुंबईकडून जेसन बेहरेनडॉर्फ आणि पियुष चावलाने प्रत्येकी तील विकेट्स तर रिले मेरेडिथने दोन आणि ऋतिक शौकिनने एक विकेट त्यांना साथ दिली. दिल्लीला आता आयपीएलमध्ये टिकून राहायचे असेल तर किमान पुढील सर्व सामने जिंकणे आवश्यक आहे.

## षटकांची गती न राखल्याने डुप्लेसीला १२ लाखांचा दंड

**मुंबई : प्रतिनिधी**



चिन्नास्वामी स्टेडियमवर अखेरच्या चेंडूपर्यंत थरारक झालेला लखनौविरुद्धचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघाचा कर्णधार फाफ डुप्लेसीसाठी दुहेरी नुकसान करणारा ठरला. बंगळूरने हातातोंडाशी आलेला सामना तर गमावलाच, त्यामुळे तीनपैकी दोन सामन्यात पराभूत होण्याची वेळ त्यांच्यावर आली. त्याच वेळी षटके निर्धारित वेळेत पूर्ण न केल्याबद्दल १२ लाखांचा दंडही करण्यात आला.

आयपीएलच्या नियमाप्रमाणे ९० मिनिटांच्या खेळात २० षटके पूर्ण करणे आवश्यक आहे. फाफ डुप्लेसी नेतृत्व करणाऱ्या बंगळूर संघाला ते जमले नाही. त्यामुळे आर्थिक दंडाची शिक्षा होण्याअगोदर जेवढा अधिक वेळ लागला तेवढा काळ पाचऐवजी चारच क्षेत्ररक्षक त्याला सीमारेषेवर ठेवता आले. या संधीचा फायदा लखनौच्या तळाच्या फलंदाजांनी घेतला. त्याचप्रमाणे एकही धाव न काढता लखनौ संघाला अखेरच्या चेंडूवर विजय मिळवून देणाऱ्या आवेश खानने भावनेच्या भरात हेल्मेट मैदानावर आपटले, या कृतीबद्दल सामनाधिकाऱ्यांनी त्याला तंबी दिली आहे. नियमाचे उल्लंघन केल्याचे त्याने मान्य केले. पुन्हा अशी चूक झाल्यास त्याला आर्थिक दंड होऊ शकतो.

## नितळस येथे गावदेवी यात्रेनिमित्त कुस्त्यांचे सामने





(छाया : अक्षय शार्दुल)

### अपूर्व प्रशांत ठाकूर यांचाही सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नितळस छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुलाच्या माध्यमातून कुस्त्यांचे सामने मंगळवारी (दि. ११) गावदेवी यात्रेनिमित्त भरविण्यात आले होते. या स्पर्धेला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत आमदार प्रशांत ठाकूर यांचे पुत्र अपूर्व ठाकूर यानेही सहभाग घेतला होता.

या वेळी भाजप नेते एकनाथ देशेकर, भाजपचे तालुका सरचिटणीस नितळस तालीमचे वस्ताद डि. बी. म्हात्रे, पनवेल तालुका कुस्ती संघटनेचे अध्यक्ष बळीराम पाटील, विनोद नाईक, नितळसचे सरपंच संदीप पाटील, माजी सरपंच शरद पावशे, भार्गव सांगडे, उपसरपंच कैलास मढवी, धर्माशेठ पावशे, मारुती पावशे, दत्ता पाटील, गुरुनाथ पावशे, संतोष गोंधळी, रुपेश पावशे, विकास पावशे, साजन पावशे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि खेळाडू उपस्थित होते.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर संस्थापक अध्यक्ष असलेल्या छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय कुस्ती संकुलाच्या वतीने गावदेवी यात्रेनिमित्त कुस्त्यांचे जंगी सामन आयोजित करण्यात आले होते. स्पर्धेतील अंतिम सामना नरेश म्हात्रे विरुद्ध हरेश कराले यांच्यात रंगला. हा सामना बरोबरीत संपला.

## माजगांव आंबिवली येथे कराटे प्रशिक्षण



**खोपोली : प्रतिनिधी**

लहान मुलांमध्ये आत्मविश्वास वाढावा, आजच्या काळात त्यांना स्वसंरक्षण करता यावे यासाठी प्रशिक्षक संजय पाटील यांनी शोतोकान कराटे असोसिएशन ऑफ इंडिया या संस्थेचा माध्यमातून माजगांव-आंबिवली येथे कराटे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १२ खेळांचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले.

यामध्ये कराटे, बॉक्सिंग, जुडो, योगा, कमांडो ट्रेनिंग, मर्दानी खेळ शिकविले जाणार आहेत. या माध्यमातून स्वतःला फिटनेस बनवून शकतो. संस्थेचे अध्यक्ष डॉ. मंदार पनवेलकर, पीयुष सर, नरेंद्र शिंदे, अमित जोशी, महिला प्रशिक्षक तेजल पाटील आदींचे प्रशिक्षण या विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहे.

प्रशिक्षणाला उत्तम प्रतिसाद लाभत असून अनेक विद्यार्थ्यांनी या खेळामध्ये सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन या खेळाचे प्रशिक्षण देण्यात आले. या वेळी जयवंत पाटील, विलास कांबळे, जयेश काठावले, आत्माराम काठावले, राजेश पाटील, मंगेश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, प्रदिप पाटील, राहुल पाटील, शशिकांत ढवाळकर, प्रमोद काठावले, भगवान जाधव, जनार्दन जाधव, जयश्री जाधव, भारती जाधव, संतोष जाधव, तुकाराम जाधव, रमेश लभडे, काशिनाथ पाटील, नरेश पाटील आदी उपस्थित होते.

### रायगड प्रीमियर लिग

## सह्याद्री चॅम्पियन्स, द्रोणागिरी मास्टर्स विजयी




**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील आरसीएफच्या मैदानावर सुरू असलेल्या रायगड प्रीमियर लिग आयोजित टी-२० क्रिकेट स्पर्धेतील तिसऱ्या दिवशी झालेल्या साखळी सामन्यात सह्याद्री चॅम्पियन्स व द्रोणागिरी मास्टर्स संघांनी विजय मिळवला आहे.

सह्याद्री चॅम्पियन्स संघांनी रायगड वॉरियर्स संघाचा चार गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करतांना रायगड वॉरियर्स संघांनी २० षटकांमध्ये सर्व गडी गमावत ११७ धावा केल्या. त्यामध्ये राहुल भोईर यांनी सर्वाधिक ३६ धावा केल्या, तर स्वानंद कदम यांनी २३ धावा काढून दुसऱ्या बाजूने साथ दिली. सह्याद्री चॅम्पियन्स संघाकडून अभिषेक पाटील आणि मानस लाळे यांनी प्रत्येकी तीन फलंदाज बाद केले. सह्याद्री चॅम्पियन्स संघांनी प्रतिउत्तर देतांना १७.१ षटकांमध्ये ११८ धावांचे लक्ष पूर्ण केले मल्हार वंजारी यांनी सर्वाधिक २५ व जय पाटणकर यांनी १८ धावा काढल्या.

दुसऱ्या सामन्यात द्रोणागिरी मास्टर्स संघांनी खांदेरी-उंदेरी संघाचा अटीतटीच्या सामन्यात ३१ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करतांना द्रोणागिरी मास्टर्स संघांनी २० षटकांमध्ये ९ गडी गमावत १३६ धावा काढल्या साईश खैरे यांनी सर्वाधिक ४५ व ओंकार सोष्टे यांनी ४८ धावा काढल्या, खांदेरी-उंदेरी किंग्सकडून नील वार्गे यांनी तीन तर समीर आवास्कर, व्यास यादव यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. प्रत्युत्तरात खांदेरी-उंदेरी किंग्स संघाचा डाव १६व्या षटकात संपला श्रेयस देशमुख २५ व व्यास यादव २० धावा वगळता कोणताही फलंदाज चमक दाखवू शकला नाही. द्रोणागिरी मास्टर्स संघांनी सामना ३१ धावांनी जिंकला. अभिषेक पाटील व ओंकार सोष्टे यांना सामनावीर म्हणून गौरविण्यात आले.

रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, आरपीएलचे अध्यक्ष राजेश पाटील, सचिव जयंत नाईक, सुरेंद्र भातिकरे, रोहित काळे, अभिजित तुळपुळे, शंकर दळवी, संदीप जोशी, ॲड. पंकज पंडित, प्रशांत माळी या वेळी उपस्थित होते.

## बजरंग मंडळातर्फे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**मुंबई** : बजरंग क्रीडा मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त पुरुष स्थानिक गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन २७ ते ३० एप्रिल दरम्यान करण्यात आले आहे.

स्पर्धेत विजयी संघास सुवर्ण चषक व ७५ हजार रु., उपविजयी संघास चषक व ५१ हजार रु. प्रदान करण्यात येतील. उपांत्य उपविजयी दोन्ही संघांना प्रत्येकी चषक व २१ हजार रु. देण्यात येतील. सर्वोत्तम ठरणाऱ्या खेळाडूस २५ हजार, उत्कृष्ट चढाई व पकडीच्या खेळाडूस १५ हजार, प्रतिदिनी उत्कृष्ट खेळ करणाऱ्या खेळाडूस रोख रु. पाच हजार देऊन सन्मानित करण्यात येईल. या स्पर्धेकरिता सुनील शिंदे (अध्यक्ष), सिताराम साळुंके (८८५०६४७०९८), कार्याध्यक्ष रमाकांत इंदप (९९३०३२६१३१) यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत.












दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com